मे २०२६
वीरनिर्वाणसंवत् २५५१
वर्ष ७६वे, पुष्प १०वे
वैशाख-अधिक ज्येष्ठ
शके १९४८
UGC-CARE Listed
Research Journal
(Since-Jun2019)
www.sanmatimasik.com

सन्मति प्रकाशन
स्थापना :१५ ऑगस्ट १९५०

ISSN- 2395-5503
RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07

बाहुबली विद्यापीठ व ब्रह्मचर्याश्रमाचे मुखपत्र

# सन्मति

मूल्य - १८ रु.

## श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम (जैन गुरुकुल), कारंजा-लाड येथे






## प. पू. गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराज यांच्या प्रतिमेचे अनावरण






अध्यात्मयोगी पट्टाचार्य प. पू. १०८ श्रमणाचार्य विशुद्धसागरजी महाराज यांचे परमप्रिय शिष्य
श्रमण १०८ श्री सुप्रभसागरजी महाराज, श्रमण १०८ श्री प्रणतसागर महाराज, क्षुल्लक श्री विप्रज्ञसागरजी
प्रतिमा अनावरणप्रसंगी......

# मी गुरुकुल संस्था बोलतेय्....!

वयाची शंभरी पार केली की कृतकृत्य भावनेने मागे बघावे..... बदलेल्या काळाला इतिहासाची माहिती द्यावी...असे म्हणतात. मी तर आता १०८ वर्षांची झाले आहे.... पू. गुरुदेव समंतभद्रजी महाराजांनी स्थापन केलेली पहिली गुरुकुल संस्था श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम.

होय! तीच मी...!! मी आज बोलायचं ठरवलंय्..... आठवणींच्या हिंदोळ्यावर झुलायचं ठरवलंय् ...!

सन १९१५-१६च्या जवळपासचा स्वातंत्र्यपूर्व काळ. सर्वत्र समाजात घुसळण चाललेली..... एकीकडे स्वातंत्र्य लढा तर दुसरीकडे समाजातील कुरूढींच्या विरोधी लढा. ही सामाजिक घुसळण सुरू असताना जैन समाज त्यापासून वेगळा कसा राहील? त्याच काळात देवचंद कस्तुरचंद शहा हा युवक लोकमान्य टिळक व क्रांतिकारकांची सोबत, उच्च शिक्षण...अशी वळणे घेत धर्म शिक्षण व समाजोन्नती अशी स्वप्ने घेवून कारंजाला आला. कारंजातील सेनगण मंदिरातील तत्कालीन भट्टारक श्री वीरसेन स्वामी यांच्याकडून समयसार शिकावा, या इच्छेने आलेल्या या तरूणाने आपल्या विचारांनी कारंजातील पाच प्रबुद्ध लोकांना भारावून टाकले. त्यांची अपूर्व दानवृत्ती व ब्र. देवचंदांचे (उत्तर आयुष्यातील समंतभद्र महाराज) योगदान यातून सन १९१८मध्ये जन्म झाला माझा, म्हणजेच श्री महावीर ब्रम्हचर्याश्रम या संस्थेचा....!

समाजातील अज्ञान व कुरूढींविरोधातील महान यज्ञाला सुरूवात झाली. जनसामान्यांसाठी शिक्षणसूर्य उगवला! सेनगण मंदिराच्या लहान प्रांगणात रुजलेले रोपटे म्हणून असलेली मी पुढे गावाबाहेरील या शेतात रुजले, बहरले....! येथे धार्मिक व आधुनिक लौकिक शिक्षण हातात हात घालून दिले जाऊ लागले. या काळात मुलांना आईवडीलांसारखे जपणारे, डोळ्यांत तेल घालून संस्कार देणारे, संस्था चालवण्यासाठी दूरदृष्टीने अनेक नियम बनविणारे ब्र. देवचंद संस्थेला फुलवत होते. मुलांना सकाळी उठवण्यापासून रात्री मुले झोपल्यानंतर कंदिलाची काच पुसून ठेवण्यापर्यंत सगळी कामे ब्रह्मचारी अवस्थेतील महाराज करत होते.

आपल्या धार्मिक ज्ञानाने काळावर ठसा उमटविणारे पंडित देवकीनंदनजी व त्यांनी संपादित केलेला पंचाध्यायी हा ग्रंथ छापण्यासाठी प्रिंटींग प्रेस आश्रमातच सुरू करून जिनवाणी प्रसाराचे अमूल्य कार्य करणारे महाराज....येथेच माझ्यासमोर वावरत होते. शिखरजी ते शिरपूर क्षेत्रासंबंधी जागरूकता निर्माण करण्यासाठी व तीर्थ सुरक्षेसाठी कळकळीने प्रेरणा देणारे महाराज तीर्थोद्धारक होते, पण दानाची प्रेरणा देतानाही 'यामुळे आपला मान कषाय पुष्ट होणार असेल तर, दान देऊन पाप विकत घेऊ नका ' असे बजावत खरा धर्म सांगणारे महाराज आत्मोद्धारक होते.

पैशांपेक्षा कार्यकर्ते महत्त्वाचे मानणाऱ्या, शिक्षण चळवळीत कार्यकर्त्यांची फौज उभारणाऱ्या, त्यांना त्यांच्या गुणदोषांसह स्वीकारून विश्वासाने काम देऊन दोषांच्या त्यागाची प्रेरणा देणाऱ्या प्रबोधक महाराजांनी अनेक कार्यकर्ते घडवले, जातिवार बसणाऱ्या पंगतीची रूढी मोडून, उच्च-नीच भेद मिटवून, सर्व जैनांना एकाच पंगतीत बसवणाऱ्या द्रष्ट्या महाराजांनी एकसंध समाज उभा केला.


स्वाध्यायासाठी प्रेरणा देऊन स्वाध्यायाची चळवळच उभारणारे महाराज एक महान व्यक्तिमत्त्व होते. सर्वसामान्यांना समजावे म्हणून आचार्यांचे ग्रंथ मराठीत आणण्यासाठी महावीर ज्ञानोपासना समिती स्थापन करणारे महाराज, मुलींसाठी कंकुबाई श्राविकाश्रमाची मुहूर्तमेढ रोवणारे महाराज, तात्याजींसारख्या शिष्योत्तमाला घडवणारे, नवीन कार्यकर्ते तयार झाल्यावर संस्था प्रपंच त्यांच्या हाती सोपवून अलगद बाजूला होणारे महाराज, आपल्या व आपल्या शिष्यांच्या आत्मोन्नतीसाठी मात्र अतिशय जागरूक होते. जणू 'आदहिदं च कादव्वं, जं सक्कई परहिदं च कादव्वं'चे जिवंत उदाहरणच !

पू. महाराजांचा अल्पकाळ सहवास देखील समोरच्याला आयुष्याचा ठेवा देवून जायचा, सुवासाचा ठेवा देणाऱ्या केशरगंधासारखा! एवढेच काय महाराजांच्या पेनने स्पर्श केलेली साधी पोस्टकार्डे सुद्धा अनंताचा ठेवा बनून संग्रही आहेत माझ्याकडे!! संस्कारांचा आदर्श म्हणून!!! (थोडीथोडकी नव्हे तर तब्बल ८०००, म्हणजे रोजचे एक म्हटले तरी, २२ वर्षे न चुकता दररोज एक पत्र....!) किती काळ? किती घटना? काय सांगू आणि किती सांगू? सगळे आताच घडल्यासारखे आठवतेय्, कारण महाराज आणि संस्था यांचे अतूट नाते! शिल्पकार आणि कलाकृतीचे असते तसे!!

आज गळा दाटून येतो आहे; कारणही तसेच आहे. माझ्या प्रांगणात माझ्याच निर्मिकाचे धातू शिल्प उभारले जाते आहे. खरे तर, 'संस्था हेच महाराजांचे स्मारक आहे आणि महाराजांचे वेगळे स्मारक नको ', ही त्यांची आज्ञादेखील शिरसावंद्यच ! पण अत्यंत प्रसिद्धीपराङ्मुख वृत्तीच्या महाराजांनी दाखवलेल्या 'न धर्मो धार्मिकैर्विना' या ब्रीदवाक्यानुसार धार्मिक पिढीला घडविणे आणि ते करताना त्यांना स्वतःच्या पायावर उभे करणे, या वाटेवरून संस्था निरंतर चालावी, एका अलौकिक महापुरुषाची प्रतिमा नजरेसमोर राहावी, त्यातून सर्वांना धर्म प्रेरणा मिळावी, नवीन पिढीला महाराज कळावेत... निदान महाराजांविषयी कुतूहल निर्माण व्हावे, महाराजांबद्दल वाचण्याची प्रेरणा निर्माण व्हावी....त्या उत्तुंग व्यक्तिमत्वाच्या प्रति अल्पशी कृतज्ञता व्यक्त व्हावी....हाच या लौकिक रूपाने पुतळा स्थापन करण्याचा उद्देश...! तो आज साकार होत आहे.... हा पुतळा व ही संस्था दोन्ही अक्षय्य रूपाने प्रेरणा देत राहणार आहेत, कारण दोन्हीची स्थापना झाली आहे अक्षय तृतीयेच्या अक्षय्य सुमुहूर्तावर.....!!

– श्री. उद्धर अशोक चवरे, विश्वस्त मंडळ सदस्य, श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम, (जैन गुरुकुल), कारंजा-लाड

सत्प्रेरणा-शुभाशीर्वाद




प.पू. गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराज

उन्नतं मानसं यस्य, भाग्यं तस्य समुन्नतम् ।

# सन्मति

पो. बाहुबली, जि. कोल्हापूर
पिन-४१६ ११० ☎(०२३०) २५८४४२२

संस्थापक-संपादक



स्व. ब्र. माणिकचंद भीसीकर
एम्. ए., न्यायतीर्थ

## मे २०२६

❍ वर्ष: ७६ वे ❍ पुष्प १०वे

❑ वार्षिक वर्गणी :२५०/-

❑ द्वादशवर्षीय वर्गणी :२५००/-

❍ संपादक मंडळ ❍

❍ **डॉ. नेमिनाथ शास्त्री,** एम.ए., बी.एड्., पीएच्.डी.

❍ **सुश्री प्रज्ञाताई डोणगांवकर,** कारंजा, बी.एस्सी.

❍ **डॉ. लीना चवरे,** कारंजा, एम.ए., बी.एड्., पीएच्.डी.

**बँक खात्याचे विवरण -**

Bank Name-ICICI Bank, Branch- Bahubali IFSC- ICIC0006388

* Shri Bahubali Vidyapeeth - A/C No- 638801700001 (80G **करपात्र सवलतीकरिता**)

* Shri Bahubali Brahmacharyashram- A/C No- 638801700002 (सन्मतिसाठी वर्गणी, दानराशी Shri Bahubali Brahmacharyashram या खात्यावर पाठवा.) (80G **करपात्र सवलतीकरिता**)

**(सन्मती मासिकातून प्रकाशित होणारे सर्व शोधप्रबंध व लेख हे संशोधक आणि लेखकांचे व्यक्तिगत विचार आहेत. त्याची प्रामाणिकता व योग्यता याविषयी तेच सर्वस्वी जबाबदार आहेत. प्रकाशक किंवा संपादक हे केवळ संवाहक आहेत.)**

## ⦿ अनुक्रमणिका ⦿


| | | |
|---|---|---|
| ✻ संपादकीय..एक सर्वमंगल यात्रा | -सुश्री प्रज्ञाताई डोणगावकर, कारंजा-लाड | ०४ |
| ✻ प्रवचनसार : जीवनस्वातंत्र्याची कला (लेख क्र. १४१) | - आर्यिका शुद्धोऽहंश्री माताजी | ०५ |
| ✻ योगसार चिंतन (पुष्प १२) | - प्रियदर्शन जैन | ०८ |
| ✻ अनंतानुबंधी कषाय : स्वरूप का ऊहापोह (भाग २) | -Discussion on Jainism Whatsapp | ११ |
| ✻ सोलहकारण भावना भाय....! (लेखांक १३) | -हर्षा वेखंडे, नागपूर | १४ |
| ✻ पट्टमहादेवी- शब्दांपलिकडील अन्वयार्थ (लेखांक - २८) | -विपुल खेडकर, नागपूर | १९ |
| ✻ प्राकृत जैन साहित्यात 'अचेलकत्व'ची संकल्पना | -सन्मती शहा, पुणे | २५ |
| ✻ पुस्तक समीक्षण-टाईम अँड सेल्फ मॅनेजमेंट | -डॉ. चारुता दर्यापूरकर, मुंबई | २९ |
| ✻ त्रिवेणी भावांजली - | | |
| १) आकाशाला गवसणी घालणारं व्यक्तिमत्त्व!!! | -कौस्तुभ आमोद मेहता | २९ |
| २) जीवन कसं जगावं ? हे शिकवणारे दादा! | -सौ. परिमल गांधी, डॅलास | ३४ |
| ३) दादा-एक जातिवंत अभियंता | -प्राजक्त आमोद मेहता | ३६ |
| ✻ मागील अंकाविषयी अभिप्राय.... | | ३७ |

**संपादकीय....**

# एक सर्वमंगल यात्रा

**सुश्री प्रज्ञाताई डोणगावकर, कारंजा-लाड**

**कारंजा-लाड येथील श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम या गुरुकुल संस्थेने शुभ अंकी १०८ वर्षे पार केली, या निमित्ताने..**

सन १९१८ची अक्षयतृतीया! या शाश्वत दान प्रवर्तन पर्वावर महाराष्ट्रातील कारंजा-लाड येथे एक विलक्षण दान सोहळा संपन्न होत होता. या सोहळ्याचा आविष्कार झाला होता, ब्र. देवचंदजी (उत्तर आयुष्यातील प. पू. गुरुदेव समंतभद्रजी महाराज) या सर्वतोभद्र व्यक्तित्वाच्या जीवन दातृत्वातून आणि साकार झाला होता, कारंजातील श्रावकोत्तमांच्या तन-मन- धनाच्या समर्पणातून !

कारंजातील जैन समाजाने अपार श्रद्धेने हे दान स्वीकारले, अत्यंत श्रद्धेने-विश्वासाने-प्रयत्नपूर्वक ते सांभाळण्याचे वचन दिले आणि हे सर्व पाहणाऱ्या नियतीने 'तथास्तु! शुभं भवतु!' म्हणत जणू त्यांना आशीर्वचन दिले.

होय, आजपासून १०८ वर्षांपूर्वी कारंजा-लाड येथे श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम (जैन गुरुकुल) या संस्थेचा झालेला हा प्रारंभ म्हणजे सकल जैन समाजासाठी सर्वोत्तम दानाचा, ज्ञानदानाचा शुभंकर संकेतच होता! महामना ब्र. देवचंदजींच्या दृष्टिसंपन्न पुरुषार्थाला स्थानिक उदारमना श्रेष्ठीगणांनी समरसून दिलेला प्रतिसाद होता!!

सन १९१८ मध्ये केवळ ८ विद्यार्थ्यांसह पू. गुरुदेवांनी या ज्ञानतीर्थाचा शुभारंभ केला होता, त्या ज्ञानतीर्थाने आजच्या अक्षयतृतीयेला १०८ वर्षे या पवित्र संख्येचा शुभंकर टप्पा गाठला आहे व ते आज हजारो विद्यार्थ्यांसाठी कल्याणकारी संस्कारधाम ठरले आहे.

सन १९१८-१९ या वर्षात संपन्न झालेल्या शतकपूर्ती समारोहाच्या प्रसंगी ज्या अनेक भावी योजनांचे संकल्प प्रस्तावित करण्यात आले होते, त्यापैकी अनेक प्रकल्प सुरू झाले आहेत, काही पूर्णत्वास गेले आहेत, काही प्रगतिशील आहेत, हे आवर्जून अधोरेखित करावेसे वाटते.

संस्थेचे बाह्यरूप निश्चितच विलोभनीय, सुदर्शन आहे.पण काय संस्थेची यशोगाथा केवळ या बाह्य वैभवाच्या आधारे लिहिली गेली आहे...?

या यशोगाथेचे खरे श्रेय आहे - सन्मार्ग प्रदाता प. पू. गुरुदेवांना, उत्कृष्ट समर्पण भावनेने तन-मन-धनपूर्वक योगदान देणाऱ्या कार्यकर्त्यांना व हितचिंतकांना, कुशल प्रशिक्षित अध्यापक वृंदाला, गुरुकुल पंचसूत्रीची ध्वजा विश्वस्तरावर फडकविणाऱ्या मेधावी व परिश्रमशील छात्रांना, आत्मीय भावनेने सेवारत असणाऱ्या कर्मचारी वर्गाला...!

निश्चितच या सचेतन अंतरंग वैभवानेच ही एकशे आठ वर्षांची यात्रा गरिमापूर्ण बनली आहे. येणाऱ्या भविष्यातही अनुभवसंपन्न ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या छत्रछायेखाली, गुरुकुल पंचसूत्रीचा अविचल ध्वज दृढपणे हाती धरलेल्या उत्साही, उर्जावान युवा साथीदारांसह गुरुकुलाची ही सर्वमंगल यात्रा अशीच सुरू राहील, हा विश्वास वाटतो.

हा प्रवास अधिक गतिमान, अधिक लोकोपयोगी व अधिक समर्पणशील होत राहावा, यासाठी अनेक हार्दिक शुभेच्छा!!

# प्रवचनसार : जीवनस्वातंत्र्याची कला

(लेख क्र. १४१)

आर्यिका १०५श्री शुद्धोऽहंश्री माताजी

पूर्वीच्या गाथेमध्ये हे सांगितले होते की दीक्षार्थी मुमुक्षू भव्य जीव योग्य गुणवंत आचार्यांच्या जवळ जाऊन आपले समर्पण करून आचार्यांना दीक्षा प्रदान करण्याची प्रार्थना करतो. त्याच्या प्रार्थनेनुसार गुरु त्याचा स्वीकार करून त्याला उपकृत करतात. आता पुढील गाथेमध्ये सांगतात की तो दीक्षार्थी कशाप्रकारे चिंतन करून यथाजात रूपी अंतर्बाह्य निर्ग्रंथ अवस्था धारण करतो.

**णाहं होमि परेसिं ण मे परे णत्थि मज्झमिह किंचि।**
**इदि णिच्छिदो जिदिंदो जादो जधजादरुवधरो**।।२०४

**अन्वयार्थ – (अहं)** मी **(परेसिं)** दुसऱ्यांचा **(ण होमि)** नाही. **(परे)** दुसरे **(मे)** माझे **(ण)** नाहीत तर **(इह)** या जगात **(मज्झ)** माझे **(किंचि)** किहीही **(णत्थि)** नाही **(इदि)** अशा प्रकारे **(णिच्छिदो)** ज्याला निश्चय झाला आहे व जो **(जिदिंदो)** जितेंद्रिय आहे तो **(जधजादरुवधरो)** यथाजात रूपधारी **(जादो)** बनतो.

या गाथेमध्ये साधुपद धारण करण्यासाठी तीन विशेषणे दिली आहेत. १) निर्ममत्व, २) जितेंद्रिय आणि ३) यथाजातरूपधारी

**१) निर्ममत्व –**

कोणत्याही पद्रव्यामध्ये त्याचे ममत्व असू नये. स्त्री, पुत्र, मित्र, कुटुंब, पशू आदी चेतन पदार्थ आणि गाव, घर, शेती, वस्त्र, भांडी, धन–धान्य, सोने–चांदी, शरीर इत्यादी अचेतन पदार्थ या सर्वांविषयी ज्याचे ममत्व उरले नसेल. ज्याचे आठ कर्मापासून बनलेल्या कार्मण शरीरावर, तैजस वर्गणापासून बनलेल्या तैजस शरीरावर अथवा मोहनीय कर्माच्या उदयाने उत्पन्न राग द्वेष मोह या रूपाने अशुद्ध उपयोगामध्ये ममत्व नसते. दान, पूजा, जप या रूपाने शुभ योगामध्ये सुद्धा ज्याचा मोह नाही. ज्याने असा निश्चय केला आहे की या जगामध्ये मी दुसऱ्यांचा नाही व दुसरे पदार्थ माझे नाहीत. माझ्या या आत्मद्रव्यात परद्रव्य, परक्षेत्र, परकाल व परभावाचे अस्तित्व नाही. मी आपल्या शुद्ध अखंड स्वद्रव्यामध्ये अमूर्तिक, शुद्ध, असंख्यात प्रदेश रूप अखंड क्षेत्रात, आपल्याच शुद्ध पर्याय रूप स्वकाळामध्ये, आपल्याच शुद्ध गुण व गुणरूप स्वभावामध्ये विद्यमान आहे. माझे अस्तित्व माझ्यामध्येच आहे. मी परद्रव्याचा नाही, परद्रव्य माझे नाहीत, असा ज्याचा निश्चय झाला आहे, तोच श्रमण होण्यास योग्य आहे.

अनादी काळापासून जगामध्ये जितकी द्रव्ये आहेत त्यामध्ये एक पण द्रव्याची हानी झाली नाही अर्थात एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचा कधीही झाला नाही. आता होत नाही व पुढेही होणार नाही. जे तीन काळात आपले होऊ शकत नाही त्यामध्ये असा भ्रम उत्पन्न झाला आहे की हे माझे आहेत. एवढ्या भ्रमावर संसार विषवृक्ष उभा आहे. ज्यांचा हा भ्रम दूर झाला आहे तेच निर्मोही साधू होत.

मूलाचारमध्ये सांगितले आहे की,

**ममत्तिं परिवज्जामि णिम्ममत्तिमुवट्ठिदो।**
**आलंबणं च मे आदा अवसेसाइं वोसरे।।४५।।**

मी ममत्वाचा त्याग करतो आणि निर्ममत्व भावामध्ये स्थिर होतो. माझे आलंबन एक माझा आत्माच आहे, शेष सर्वांचा मी त्याग करीत आहे. ज्ञानी निर्ममत्वाचे चिंतन कसे करतो हे सांगताना इष्टोपदेश या ग्रंथात पूज्यपाद आचार्य म्हणतात..

**एकोऽहं निर्ममो शुद्धो ज्ञानी योगीन्द्रगोचरः।**
**बाह्याः संयोगजा भावाः मत्तः सर्वेऽपि सर्वथा।।२७।।**

मी एक आहे, निर्मळ आहे, शुद्ध आहे, ज्ञानी आहे, योगींद्रांच्याकडूनच जाणण्यायोग्य आहे. अन्य सर्व संयोगापासून उत्पन्न होणारे सर्व भाव

माझ्यापासून सर्वथा भिन्न आहेत. हे शरीर सुद्धा एक दिवस जळून जाणार आहे. यावर ममत्व करून काय उपयोग? खरोखर जर स्वतःची प्रतिष्ठा राखायची असेल तर एक शुद्ध ज्ञान स्वरूपाची उपासना करावी. मी ज्ञानमात्र आहे. ज्ञानभाव सोडून मी अन्य काही नाही. मी ज्ञानाचाच कर्ता व भोक्ता आहे. या ज्ञान स्वभावाहून अन्य कोणाशी माझे कोणतेही नाते नाही. असा निर्मळ स्वभाव ज्याच्या अंतरंगात प्रकट होतो, तोच साधू बनण्यास पात्र आहे.

श्री समयसार कलशमध्ये अमृतचंद्र आचार्यदेव म्हणतात..

**विश्वाद्विभक्तोऽपि हि यत्प्रभावा–**
**दात्मानमात्मा विदधाति विश्वम्।**
**मोहैककन्दोऽध्यवसाय एषः**
**नास्तीह येषां यतयस्त एव॥**

हा आत्मा सर्व विश्वापासून भिन्न आहे. तरीसुद्धा ज्या मोहाच्या प्रभावाने हा जीव मोहित होऊन विश्वाला आपले मानतो. तो मोहाच्या मुळापासून उत्पन्न होणारा अभिप्राय ज्यांना माहित नाही, तेच वास्तविक साधू आहेत. या अद्वैत स्वानुभवरूपी स्वभावाची भावना निरंतर करणे साधूचे कर्तव्य आहे.

**२) जितेंद्रियता–**

साधूला आपल्या पाचही इंद्रिय व मनावर असा संयम ठेवला पाहिजे की ज्याप्रमाणे एक घोडेस्वार आपल्या घोड्यावर लगाम लावून त्याला आपल्या अधीन करतो. साधू कधीही इंद्रिय व मनाच्या इच्छांच्या अधीन होत नाही; कारण त्याला आपल्या आत्मिक अतींद्रिय सुखाची रुची असते. इंद्रियसुख असमाधान व जीवांना संक्लेश देणारे असते. अतींद्रिय सुख आत्म्याला संतुष्ट करून मुक्तीच्या मनोहर शयनकक्षामध्ये घेऊन जाणारे आहे, असा विश्वास ठेवणारा ज्ञानी जीव स्वभावानेच जितेंद्रिय होतो. स्वभावावर दृष्टी ठेवून स्वतःला निर्मम मात्र अनुभवणे हाच इंद्रियांचा विजय आहे. हाच मनावर विजय आहे. हाच कर्मसेनेवर विजय मिळविण्याचा उपाय आहे. दुसऱ्या पदार्थावर दृष्टी ठेवून इंद्रियावर विजय मिळविता येत नाही.

एक राजा होता. त्याने सर्व राजांना पराजित केले. त्याला सर्वजण सर्वजित म्हणू लागले. पण त्याची आई कधी त्याला सर्वजित म्हणत नव्हती. तो आईला म्हणतो, 'सर्वजण माझा जय जयकार करतात आणि तू मला सर्वजित का म्हणत नाहीस? मी तर सर्व देशावर विजय मिळविला आहे.' तेव्हा आई म्हणते, 'हे बाळ! तू सर्व राज्यांना जिंकलेस, परंतु आपल्या या मनाला जिंकले नाहीस. आपल्या इंद्रिय व कषायावर विजय मिळविला नाहीस. तू आपल्या विज्ञान घन स्वभावी आत्म्याचे दर्शन केले नाहीस. आपल्या कर्मरूपी शत्रूला जिंकले नाहीस. तर तू सर्वजित कसा होऊ शकतोस? तू बाहेरील जगात प्रयत्न केलास, पुरुषार्थ केलास, पराक्रम गाजविलास. परंतु जोपर्यंत कषाय शत्रूंना जिंकले नाहीस तोपर्यंत विजयी होऊ शकत नाहीस. आपली दृष्टी अंतर्मुख करून आपल्या अनंत गुणरूपी आत्मराज्याचा तू स्वामी हो. तर तू खरा सर्वजित होशील, तेव्हाच मी तुला सर्वजित म्हणेन.'

ज्यांनी अंतरंगातील अतिसूक्ष्म चैतन्य स्वभावाच्या अवलंबनाने अचेतन पुद्गलद्रव्य स्वरूपी द्रव्येंद्रियापासून स्वतःला भिन्न जाणले, अखंड ज्ञान स्वभावाच्या आश्रयाने खंड खंड ज्ञानरूप भावेंद्रिय यांना आपल्यापासून भिन्न केले. तसेच स्वयं अनुभूयमान स्वभावाच्या अवलंबनाने इंद्रियांचे विषय रूप ज्ञेय पदार्थांना भिन्न जाणले, तोच खरा जितेंद्रिय जिन आहे. सम्यग्ज्ञानाच्या प्रभावाने वस्तू स्वरूपाचा विचार करणाऱ्या साधू पुरुषाला जितेंद्रियपणा प्राप्त होतो.

**३) यथाजात रूपधारी–**

ज्याप्रमाणे बालक जन्माच्या वेळी निर्विकार नग्न असते त्याप्रमाणे साधूंचेही यथाजात-रूप असते. नवजात शिशू निरागस, निर्विकार, निष्पाप असते, पण येथे गृहस्थांच्या संगतीमध्ये येऊन वस्त्र-आभूषणे ग्रहण करते. त्या सर्वांचा त्याग करून जसा जन्माला आला होता तसा विरक्त भाव धारण करणे म्हणजे खरे यथाजातरूपधारीपणा होय.

ज्याप्रमाणे सुंदर आहार आहारसंज्ञेमध्ये, सुंदर स्त्रीचे दर्शन कामभोगाच्या इच्छेमध्ये व अग्नीचे १६ ताव सोन्याला शुद्ध बनविण्यामध्ये निमित्त असते त्याप्रमाणे शुद्ध निर्विकर भावलिंग होण्यातच साधूचे परिग्रह रहित बाह्य नग्न होणे हे निमित्त असते.

ज्याप्रमाणे जन्मलेल्या बालकाला कोणताही विकार नाही म्हणून तो नग्न आहे. त्याला नग्न राहण्यात संकोच नसते. लज्जा नसते. त्याप्रमाणे साधूनाही नग्नतेमध्ये विकार, संकोच किंवा लज्जा असत नाही. जन्माला आलेले बालक सहज असते तसे साधूचे जीवनही सहज शुद्ध आत्मद्रव्याच्या आश्रयाने यथाजात रूपधारी असते.

शरीर आत्म्याच्या विकासात सहकारी असते. तसेच तपस्येस बहिरंग साधक आहे म्हणून शरीराची रक्षा करतात, परंतु शरीरावर जे वस्त्राभूषणे असतात त्याचा त्याग करून जे सहनशील आणि धीर वीर बनतात, तेच निर्ग्रंथ दिगंबर जिनमुद्राधारी बनतात. मनाच्या दृढतेमुळे मोठमोठे कष्ट सहजतेने सहन होतात.

एक लोभी व्यापारी ज्येष्ठ महिन्यांच्या उन्हामध्ये चप्पल न घालता लाकडाचे ओझे घेऊन जात असतो. तो व्यापारी धन कमवण्याच्या लालसेने उन्हाळ्याच्या कडक उन्हामध्ये माल उचलतो, ठेवतो. इकडे तिकडे करतो. तरीसुद्धा कष्ट वाटत नाही; कारण लोभामुळे त्याचे मन कठोर बनलेले असते. त्याप्रमाणे आत्मरसिक साधू निज आत्म्याच्या आनंदाने प्रेरित होऊन तपश्चरण करतात. तेव्हा ते भूक, तहान, शीत-उष्ण इत्यादी परिषहांना सहजतेने सहन करतात. यात त्यांना कष्ट वाटत नाही. आत्मानुभवाच्या रसास्वादाने त्याचे मन धीर-गंभीर बनलेले असते.

जे भित्रे असतात त्यांना नग्नपणा धारण करणे कठीण वाटते. शूरवीर योद्धा युद्धात जातो. शत्रूंनी सोडलेल्या बाणांचा वर्षाव सहन करतो आणि त्याच्यावर विजय मिळवणे हे एकच कर्तव्य समजतो. त्याचप्रमाणे कर्मशत्रूबरोबर लढण्यासाठी मुनिपद धारण करणे, अनेक उपसर्गांना सहन करणे आणि कर्म शत्रूला जिंकणे हेच एकमेव साधकास कर्तव्य वाटते. या दोन्हीही वीरांना उत्साह व आनंद वाटत असतो.

नग्नता धारण करणे फार कठीण नाही. प्रत्येक कार्य अभ्यासाने साध्य होते. श्रावक प्रतिमांची पायरी चढत चढत अकराव्या प्रतिमेमध्ये केवळ लंगोटी धारण करतो आणि एक दिवस त्या वस्त्राचाही मोह सुटतो. सहनशीलता वाढते, लज्जा व काम विकाराचा सहजतेने नायनाट होतो, तेव्हा तो साधक साधू पदाला प्राप्त होतो.

कपड्याने, चमड्याने, झाडांच्या सालीने किंवा अन्य कोणत्याही प्रकारे शरीराला झाकले जात नाही. आभूषणे नाहीत. तसेच अंतरंग परिग्रह नाही. तेच खरे अचेलकत्व. ही अरिहंत भगवंतांची मुद्रा सदैव वंदनीय व पूजनीय आहे.

यथाजातरूपपणा म्हणजे बहिरंग व अंतरंगामध्येही निर्दोषपणा असणे. ज्याप्रमाणे शरीराशिवाय कोणतीही पर उपाधी नाही त्याचप्रमाणे अंतरंग आत्म्यामध्ये सुद्धा राग-द्वेष इत्यादी कोणताही विकार नाही अशा आपल्या आध्यात्मिक उच्च स्तराला यथाजातरूपपणा म्हणतात.

जो साधू पराशी कोणताही लगाव न ठेवता अंतरंगामध्ये केवळ ज्ञानस्वरूप राहतो. जगात तोच महान बनतो. ज्यांनी स्वतःला अनुभवले, त्यांनाच शांती मिळू शकली. केवळ आपल्या आत्म-स्वरूपाचा रसास्वादन घेतो तोच अपरिग्रही बनतो. सहा खंडाचा अधिपती असणारा चक्रवर्ती सुद्धा जैनेश्वरी दिगंबर दीक्षा धारण करतो, म्हणून आचार्य समंतभद्र स्वयंभूस्तोत्रात नमिनाथ भगवंतांची स्तुती करताना म्हणतात की, सर्व प्राण्याविषयी अहिंसेचा भाव हाच जगात परम ब्रह्मभाव आहे. जेथे थोडासुद्धा आरंभ नाही तीच खरी अहिंसा होय, म्हणून आयुष्याच्या सफलतेसाठी अंतर्बाह्य परिग्रहाचा त्याग करणे, अत्यंत आवश्यक असते. अशा प्रकारे आत्मतत्त्वाच्या सिद्धीसाठी निर्ग्रंथ जैनेश्वरी दीक्षा धारण करून विज्ञानघन स्वभावी निजशुद्ध परमात्म्याची आराधना करावी.

**( क्रमशः )**

# योगसार चिंतन

(पुष्प १२)

– **प्रियदर्शन जैन**

गाथा क्र. २५-२६

**चउरासीलक्खह फिरिउ, काल अणाइ अणंतु।**
**पव सम्मत ण लद्धु, जिउ एहउ जाणि णिभंतु।२५।**

**सुद्धु सच्चेयणु बुद्धु, जिणु केवलणाण सहाउ।**
**सो अप्पा अणुदिणु, मुणहु जइ चाहउ सिवलाहु।२६।**

अर्थ - अनादिकालापासून हा जीव या संसाररूपी भवसागरात फिरत आहे याचे मूळ कारण म्हणजे, सम्यग्दर्शनाचा अभाव, यात तिळमात्र संशय बाळगू नकोस।।२५।।

अर्थ- जर तुला मोक्षाची इच्छा आहे तर, मग सतत आपल्या आत्मतत्त्वाचा अनुभव कर, जो शुद्ध-बुद्ध पूर्ण निरावरण असा ज्ञानस्वभावाचा (केवलज्ञान) धारक आहे; जो निरंजन आहे, कर्माने रहित आहे, जो चेतनामय आहे व ज्याचे स्वरूप संसारविजयी जिनेंद्रांच्या समान आहे.।।२६।।

२५- आचार्य देव सांगू इच्छितात- 'एक अभेद चिदानंद अशा आपल्या आत्मस्वरूपाच्या आश्रयाशिवाय सम्यग्दर्शन कसे प्रगट होणार ? या शिवाय आम्ही सर्व काही केले, परंतु करण्यायोग्य हेच कार्य आहे, हे विसरूनच गेलो..!

आचार्य समंतभद्रदेव रत्नकरंड श्रावकाचार या ग्रंथात सांगतात, 'सम्यग्दर्शन हे ज्ञान आणि चारित्र्यापेक्षा श्रेष्ठ आहे, हे जाणून त्यास प्राप्त करण्याचा उद्यम केला पाहिजे. यास मोक्षमार्गाचा कर्णधार म्हटले आहे.. जसा नावाडी समुद्रातून जहाजास पार करवितो, त्याचप्रकारे अपार संसार समुद्रातून रत्नत्रयरूपी जहाजास पार करण्यासाठी सम्यग्दर्शन नावाड्याचे कार्य करते.(श्लोक क्र. ३१)

जसे बीजाच्या अभावी वृक्षाची उत्पती, स्थिती, वृद्धी व फलोदय शक्य नाही, त्याच प्रकारे ज्ञान व चारित्र्याची उत्पत्ती, स्थिती, वृद्धी व फलोदय सम्यग्दर्शनाशिवाय शक्य नाही. (श्लोक क्र. ३२)

आगमात मिथ्यात्वाला सगळ्यात मोठे पाप सांगितले आहे. बाकी सर्व शुभ-अशुभ (पुण्य-पाप रूपी) क्रिया अनंत वेळा केल्या, परन्तु एक स्वानुभवरूपी धर्मक्रिया करण्याचा उद्यम कधीच केला नाही. आचार्यदेव येथे सांगू इच्छितात.-

'अनादिकाळापासून हा जीव चौऱ्यांशी लक्ष योनींमध्ये फिरत आहे आणि सम्यग्दर्शनाच्या प्राप्ती शिवाय अनंतकाळापर्यंत फिरणार आहे, यात तिळमात्र शंका बाळगू नकोस.'

आपल्या आत्मतत्त्वाच्या श्रद्धेशिवाय सर्व प्रकारचे शुभ-अशुभ परिणाम अनंतवेळा केले..... सुख बाह्य गोष्टींमध्ये आहे, याच भ्रमात चुकीचा प्रयत्न करीत अनंत काळ व्यतीत केला. तोच प्रयत्न जर सुखाला अंतरंगात शोधण्याकरिता केला असता तर आपल्या दिव्य स्वरूपाची प्राप्ती आणि अनुभव अंशतः तरी नक्कीच झाला असता! छहढाला या ग्रंथात पंडितप्रवर दौलतरामजी यांनी प्रथम ढालेत याचे मार्मिक विवेचन केले आहे.

अनादिकाळापासून जीवद्रव्य सोडून बाकीचे पाचही द्रव्य आपआपले परिणमन नियमित प्रकारे करीत आहेत. या अमूल्य आयुष्याचा काळ व्यर्थ व्यतीत होत आहे..आता तरी जागा हो..

ते सांगतात-'खऱ्या सुखाचे कारण समीचीन ज्ञान (वस्तुस्वरूपाचे यथार्थ ज्ञान, निर्णय आणि श्रद्धा) आणि त्यानुसार आचरण हेच आहे, दुसरे कोणतेच नाही.'

आचार्य कुंदकुंदांनी केवळ बाह्य आचरणाला मोक्ष मार्ग म्हटले नाही तर, सम्यग्दर्शनासहित बाह्य आचरणाला मोक्षमार्ग म्हटले आहे. त्यांनी आपल्या ग्रंथांत अनेक ठिकाणी याचे वर्णन केले आहे..

**दंसण मूलो धम्मो!** - अर्थात् सम्यग्दर्शन हेच धर्माचे मूळ कारण आहे, असे त्यांनी आपल्या अष्टपाहुड या मौलिक ग्रंथात प्रथम अध्यायात सांगितले आहे. हा संपूर्ण अध्याय त्यांनी सम्यग्दर्शनालाच अर्पित केला आहे. दुसऱ्याच गाथेत ते सांगतात.-

**सद्धर्म का है मूल दर्शन, जिनवरेंद्रो ने कहा।**
**हे कानवालो सुनो, दर्शनहीन वंदन योग्य ना।।**
**दृग भ्रष्ट है वे भ्रष्ट है,उनको कभी निर्वाण ना।**
**हो सिद्ध चारित्र भ्रष्ट, पर दृगभ्रष्ट को निर्वाण ना।।**

यावरून सम्यग्दर्शनाची महती आपल्या लक्षात येते! प्रवचनसार ग्रंथात सातव्या गाथेत ते सांगतात.-

**चारित्र्य ही धर्म है, वह धर्म समताभाव है।**

चारित्र्य हाच धर्म आहे, परंतु तो समताभावाने युक्त असायला हवा. येथे समत्वभावास प्राधान्य दिले आहे. मग तो समताभाव कसा प्राप्त होणार?.. तर वस्तुस्वरूपाचा यथार्थ निर्णय करून! वस्तुस्वरूपाचा यथार्थ निर्णय कसा होणार??... तर आगम अभ्यास करून....सम्यक् स्वाध्याय करून.....! म्हणूनच स्वाध्यायास परम तप म्हटले जाते. सम्यग्दर्शनाच्या प्राप्तीसाठी स्वाध्यायालाच प्रमुख कारण म्हणून सांगितले आहे. सम्यग्दर्शनाने युक्त स्वाध्याय-दान-पूजा-शील आदि सर्व कामे कर्मक्षयाला कारणीभूत आहेत आणि सम्यग्दर्शनाशिवाय हीच सर्व दीर्घ संसाराची कारणे आहेत. मिथ्यादृष्टी जीवांना होणारा बंध हा अनंत संसारास कारणीभूत असतो आणि सम्यग्दृष्टी जीवांना होणारा बंध क्षणिक किंवा अल्पकालीन असतो.

याचे मार्मिक विवेचन कुंदकुंददेव समयसार ग्रंथाच्या आस्रव अधिकारात करतात.

१६६- क्रमांकाच्या गाथेत ते म्हणतात- 'ज्ञानी जीवाचे भाव कधीच अज्ञानमय होत नाहीत, म्हणूनच त्यांना राग-द्वेष-मोह (आस्रव) होत नाहीत आणि यांचे अभावी त्यांना नवीन बंध होत नाही.. ज्ञानी जीव सदा ज्ञानस्वभावातच रममाण असतो.. कर्तृत्वात नाही.. म्हणूनच त्यांना नवीन कर्मबंध होत नाही. ही सर्व सम्यग्दर्शनाचीच महती होय.'

येथे आचार्यदेव सांगू इच्छितात की-'सिद्ध भगवंतांच्या समान पूर्णानंदाचा घनपिण्ड अशा आपल्या शुद्धस्वरूपी आत्मदेवाचे मनन, चिंतन व अनुभवन हाच एकमेव मोक्षाचा मार्ग आहे. वस्तुस्वरूपाच्या यथार्थ बोधातूनच रत्नत्रयरूपी वृक्ष प्रगट होतो व यातूनच स्वानुभवरूपी फलाची प्राप्ती होते.'

२६- आचार्यदेव सांगतात की- 'आत्म्याची परमोच्च आनंदमय दशा म्हणजे मोक्ष! भगवंताच्या दिव्यध्वनीत तुझ्या स्वरूपाचे वर्णन आले आहे, तर मग ती दशा किती आनंददायक असेल, त्याचे वर्णन शब्दातीत आहे. जर तुला मोक्षाची इच्छा आहे तर आपल्या आत्मस्वभावाचे मनन-चिंतवन कर.'

हे विश्व अनादि-अनंत- स्वयंभू आहे. या विश्वातील समस्त पदार्थ (द्रव्य) आपापल्या गुणांनी परिपूर्ण आहेत.. मग तू देखील त्यातच आलास ना..अरे वेड्या! तू सुद्धा परिपूर्णच आहेस....परंतु याकडे तुझे लक्ष नाही....आजपर्यंत तू स्वतःची ओळखच करून घेतली नाहीस...म्हणूनच तुला परद्रव्यांविषयी आकुलताच होत राहिली.. अनंत गुणांच्या वैभवाचा स्वामी असलेला तू, दीन-हीन होऊन राहिलास....!

अनुकूल निमित्त मिळावे, सतत शुभभाव वर्तावे, कषयांची मंदता व्हावी, असे परिणाम तर अनादि काळापासून करीत आलास..... परंतु एक परमानंदमय, निर्विकल्प, सच्चिदानंद अशा आपल्या आत्मदेवाचे ध्यान तू केले नाहीस.. स्वानुभूती म्हणजेच स्वतःची प्रतिती.. स्वतःचा अनुभव आणि स्वतःमध्ये स्थिरता हाच खरा तुझ्यासाठी धर्म आहे!'

आचार्य देव जणू काही आश्चर्य व्यक्त करत

आहेत की, हा जीव सर्व परवस्तूंचा विश्वासाने स्वीकार करतो, परंतु आपल्या सत्तेचा स्वीकार करीत नाही. ते म्हणतात,-

'तुझा आत्मदेव हा ज्ञानमूर्ती चैतन्यमय आहे.. हा अनमोल गुण फक्त तुझ्याजवळच आहे..इतर कोणाजवळ नाही..तो तुला प्राप्त होईलच!' हा विश्वास आचार्यदेव या गाथेतून आपणास देत आहे.

स्वभावरूपाने हा आपला आत्मदेव म्हणजे संसार विजयी जिनेंद्रच आहे, जिथे आहे सर्व विकल्पाचा अभाव व फक्त ज्ञानाचाच सद्भाव! असे ज्ञान पर पदार्थांतून येत नाही तर, तू स्वतःच ज्ञानस्वभावाने युक्त असा घनपिंड आहेस....स्वतः चैतन्य रसाने सराबोर आहेस.. त्याचाच धाराप्रवाह रुपाने अनुभव कर.. तुला शिवलाभ मिळणारच, असा विश्वास आचार्यदेव देत आहेत.

परद्रव्य कधीच कोणाचे होत नाही.... एकाच वस्तूचा भोग कितीतरी लोक करतात.. कालद्रव्य याला साक्षी आहे. एकच पुद्‌गलपिंड कधी राजमहालाचे रूप धारण करतो तर, कधी स्मशानाचे तर, कधी मंदिररूपाने परिणमतो. एक आत्मतत्त्वच असे आहे, जे तिन्ही काळात आत्मरूपानेच परिणमन करीत असते; म्हणूनच म्हटले आहे,

**तीनकाल में एक होय, परमारथ नो पंथ!**

या उक्तीनुसार मार्ग तर हा एकमेव आहे.... दुसरा कोणताच नाही.. याच मार्गाने आत्मदेवाची प्राप्ती सुलभ होईल.. हेच आचार्यदेव या गाथेतून सुचवत आहेत.

व्यवहारनयाने आपण तर एक सामान्य गृहस्थच ना?... मग आपण काय विचार करायला पाहिजे? आगमात एक उदाहरण आले आहे-

**पानीमें नाव रहे, मगर नावमें पानी न रहे ! या उक्तीप्रमाणे हम दुनियामें रहे, मगर दुनिया हममें न रहे!** अशा भूमिकेनुसार सर्व क्रिया करीत असताना सुद्धा आपल्याला आपल्या शुद्ध चैतन्य स्वरूपाचे भान हवे.. क्षणिक अवस्थेचे किंवा परिवर्तनाचे चिंतन न करता.. त्यामध्ये न अडकता सतत आपल्या शाश्वत ध्रुव स्वरूपाचे चिंतन केले पाहिजे.. या विश्वाप्रमाणे मी सुद्धा अनादि-अनंत- स्वयंभू आहे, या अकाट्य सत्याची शिदोरी सोबत घेऊनच जीवनाचा प्रवास केला पाहिजे.

**(क्रमशः)**

---

## बाहुबली गुरुकुलातील विद्यार्थ्यांची धार्मिक सहल

अनेक विद्यार्थ्यांनी द्रव्यसंग्रह, रत्नकरंड श्रावकाचार, छहढाला, समाधी शतक, इष्टोपदेश तसेच अनेक प्राकृत व संस्कृत स्तोत्रांचे पाठांतर केले आहे. त्यांचे धार्मिक ग्रंथ पाठांतरामध्ये केले जाणारे प्रयत्न, उत्साह व त्यांची रुची पाहून त्यांना अशीच प्रेरणा मिळावी या हेतूने प्रतिवर्षी संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना तीर्थक्षेत्रांचे दर्शन घडवून आणले जाते. यापूर्वीही धार्मिक ग्रंथ पाठांतर करणाऱ्या विद्यार्थ्यांना मांगीतुंगी, गजपंथा, नमोकार तीर्थ, अभय प्रभावना पुणे, कुंथलगिरी इत्यादी अनेक तीर्थक्षेत्रांवर सहलीसाठी नेण्यात आले आहे. या ही वर्षी धार्मिक ग्रंथ पाठांतर करणाऱ्या विद्यार्थ्यांना ५ जून ते १० जून २०२६ पर्यंत श्रवणबेळगोळा या धार्मिक क्षेत्रांच्या दर्शनासाठी धार्मिक सहलीचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सहलीसाठी धर्मानुरागी **श्री. सुहास शहा डोंबिवली, मुंबई** यांच्याकडून विद्यार्थ्यांचा येणारा खर्च देण्यात आलेला आहे. विशेष वृत्त पुढील अंकात......



परमपूज्य गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराज यांच्या व्रतीमालिकेतील व बाहुबली गुरुकुलाचे ज्येष्ठ कार्यकर्ता बालब्रह्मचारी **श्रीधर यशवंत मगदूम अण्णा यांचे ज्येष्ठ बंधू श्री. सुरेंद्र यशवंत मगदूम, रा. भिलवडी** यांचे वयाच्या ८७व्या वर्षी वृद्धापकाळाने बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० वाजता देहावसान झाले. गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता भिलवडी येथे रक्षाविसर्जन झाले. त्या भव्य जीवास सद्‌गती लाभो, ही भावपूर्ण श्रद्धांजली..!!

**श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम व विद्यापीठ**

# अनंतानुबंधी कषाय : स्वरूप का ऊहापोह
## (भाग २)

**Discussion on Jainism Whatsapp Group**

**७. अनंतानुबंधी कषाय/कर्म का छह माह तक का सम्बन्ध क्या है?**

इस सन्दर्भ में 'वासना काल' शब्द का प्रयोग किया जाता है। वासना काल का अर्थ है, कितने समय तक अनंतानुबंधी कषाय चलती है। अनंतानुबंधी कषाय कम से कम छह माह तक चलती है। यानी उसी प्रकार की कषाय लगातार कम से कम छह माह तक चलती रहती है। यह लगातार कम से कम छह माह तक चलनेवाली कषाय कही store नहीं होती, अपितु धारावाहिक रूप उसका असर होता है। अनंतानुबंधी कषाय के निमित्त रूप अनंतानुबंधी कर्म कम से कम लगातार छह माह तक चलती है। लेकिन जो जीव पुरुषार्थ करते है वे इन कर्मों की निरंतर उदय में आनेवाली धारा को खंडित करते हुए उसका उपशम करते है और सम्यक्त्व प्राप्त करते है। यहाँ विशेष ये की अनंतानुबंधी का वासनाकाल उसके उदय के बाद भी संस्कार रूप पाया जाता है। जैसे जमीन में से कील निकालने के बाद छिद्र बना रहता है। उसकी सत्ता अनादि-सांत भव्य और अभव्य को अनादि-अनंत होती है, और वासना काल छह महीने होता है।

यहाँ गौर करने वाली बात है की कषाय में निमित्त चारित्रमोहनीय ही होता है, दर्शनमोहनीय नहीं। इनमें संक्रमण भी नहीं होता। इन दो कर्मों की कार्माण वर्गणाएँ भी भिन्न होती है।

**८. लेकिन ऐसे छह माह तक लगातार चलने वाले अनंतानुबंधी कषाय हमारी तो पकड़ में नहीं आती, फिर आप कैसे कह सकते हो की ये छह माह तक चलती है?**

इसका उत्तर हम पंडित दिनेशभाई शाह कृत (अनुवादित) स्वानुभव पुस्तक के आधार से देते हैं। पृष्ट क्रमांक ३६ पर उन्होंने दो प्रकार के विकल्पों का जिक्र किया है : बुद्धिपूर्वक और अबुद्धिपूर्वक। बुद्धिपूर्वक विकल्प हमारी पकड़ में (ज्ञान में) आते है। अबुद्धिपूर्वक विकल्प हमारी पकड़ में (ज्ञान में) नहीं आते है। हमारा यह अनुमान है की लगातार छह माह तक चलनेवाली अनंतानुबंधी कषाय उत्पन्न होते समय तो हमारी पकड़ में आती है, मतलब तब वह बुद्धिपूर्वक कषाय रूप होती है। मगर अगले कम से कम छह माह तक उसका निरंतर चालु रहनेवाला उदय हमारी पकड़ में नहीं आता क्यूंकि वह अबुद्धिपूर्वक कषायरूप प्रवर्तती है। हम छद्मस्थ है इसलिए हमारी पकड़ में नहीं आती, लेकिन केवली भगवान् के ज्ञान में जरूर झलकती है, यानी की प्रत्यक्ष हमारी परिणति में होती ही है। बुद्धिपूर्वक और अबुद्धिपूर्वक कषाय यह भेद और भी प्रकार से किये जाते है। (अधिक जानकारी के लिए देखिये मोक्ष मार्ग प्रकाशक, प्रकरण ७ - निश्चयाभासी)

**९. अनंतानुबंधी कषाय का लक्षण क्या है?**

अनंतानुबंधी कषाय का स्थूल और उपचरित लक्षण सम्यक्त्व का घात करना कहा है। इस उत्तर को प्रश्न क्रमांक ६ और उसके उत्तर को साथ लेकर पढ़े। इसका सटीक लक्षण है ऐसे कषाय परिणाम जो सम्यक्चारित्र का घात करता है जिसके चलते स्वरूपाचरण (सम्यक्त्वाचरण) चारित्र का अभाव होता है।

**१०. यह लक्षण किसतरह निर्दोष है?**

अनंतानुबंधी क्रोध, मान, माया और लोभ इन सभी में ये (स्थूल और उपचरित तथा सटीक) लक्षण पाया जाता है इसलिए इसमें अव्याप्ति दोष नहीं आता। अप्रत्याख्यान, प्रत्याख्यान, और संज्वलन कषाय में ये लक्षण पाया नहीं जाता इसलिए अतिव्याप्ति दोष नहीं आता। और हमारा मिथ्यात्व तो

हमको एकदम स्पष्ट प्रतिभासित होता है (अतीन्द्रिय आनंद की अनुपस्थति में), इसलिए ये लक्षण असंभव दोष से भी रहित है। इन तीनो दोषों से रहित होने के कारण 'सम्यक्त्व / सम्यक्त्वाचरण (स्वरूपाचरण) चारित्र का घात करना' ये लक्षण निर्दोष साबित होता है।

**११. स्वरूपाचरण(सम्यक्त्वाचरण)चारित्र क्या है?**

सर्वज्ञ के आगम में तत्त्वार्थ का स्वरुप कहा उसको यथार्थ जानकार श्रद्धान करना और उसके शंकादि अतीचार मल दोष कहे, उनका परिहार करके शुद्ध करना तथा उसके निःशंकादि गुणों का प्रगट होना वह सम्यक्त्वाचरण (स्वरूपाचरण) चारित्र है।

सम्यक्त्व को दूषित करनेवाले २५ दोष जिनागम में कहे है। ८ प्रकार का मद (ज्ञान, पूजा, प्रतिष्ठा, ऐश्वर्य, कुल, जाती, बल, ऋद्धि, तप, शरीर, रूप), ८ प्रकार के अंग (निःशंकित, निःकांक्षित, निर्विचिकित्सा, अमूढ़दृष्टि, उपबृहन, स्थितिकरण, वात्सल्य, प्रभावना) का विपरीत ग्रहण, ६ अनायतनों का सेवन (कुदेव, कुगुरु व कुशास्त्र के तथा इन तीनों के उपासकों के घरो में आना-जाना), और ३ मूढ़ताएं (लोक, देव, पाखंडी) (८ + ८ + ६ + ३ = २५)। इन २५ दोषों का चारित्र में से मिट जाने पर सम्यक्त्वाचरण (स्वरूपाचरण) चारित्र प्राप्त होता है।

अन्य शब्दों में कहे तो आत्मस्वरूप में एक क्षण ही सही, लीन होना सम्यक्त्वाचरण चरित्र है। जब श्रद्धा समीचीन होती है तब नियमसे ज्ञान और चारित्र भी समीचीन होते है,ऐसा सहज योग बनता है।

**१२. इस सम्यक्त्वाचरण (स्वरूपाचरण) चारित्र में तो हमें सबकुछ श्रद्धा के बारें में ही नजर आता है, तो इसे सम्यक्त्वाचरण (स्वरूपाचरण) चारित्र कैसे कहा?**

अगर गौर से पढ़ेंगे तो समझ में आएगा की सर्वज्ञ के आगम में तत्त्वार्थ का स्वरुप कहा उसको यथार्थ जानकार श्रद्धान करना ये तो श्रद्धान ही है, लेकिन उस श्रद्धान को निर्मल करने हेतु जो अतिचार मल दोष कहे, उनका परिहार करना तथा उसके निःशंकादि गुणों को प्रगट करना वह सम्यक्त्वका आचरण कहा है (मतलब चारित्र गुण की पर्याय). आचरण चारित्र गुण की पर्याय है। मन, वचन व काय की क्रिया उपचार से चारित्र है।

**१३. अनंतानुबंधी कषाय का भावार्थ क्या है?**

इसका भावार्थ अनेक प्रकार से किया जा सकता है। जैसे जो जीव अनंत संसार से भयभीत है, उनका ये कर्त्तव्य है की वह अपने अनंत मिथ्यात्व को मिटाने के लिए उग्र पुरुषार्थ करे और अपनी अनंत मिथ्या मान्यताओं को तुरंत तिलांजलि दें इस बात को अच्छी तरह समझे की अनंतानुबंधी कषाय का सम्बन्ध तीव्र/मंद (लेश्यानुसार वर्गीकृत) से नहीं है, अपितु कषाय करने के अभिप्राय से है। कषाय करने का अभिप्राय तभी त्यागा जा सकता है जब जीव विचारपूर्वक यह ठोस निर्णय करता है की मैं मात्र परम पारिणामिक भाव स्वरुप हुँ। मेरे ही द्रव्य, क्षेत्र, और काल में औदयिकादि भाव मौजूद जरूर है, लेकिन उनमें मेरा एकत्व कभी भी नहीं हो सकतों वे सारे भाव कर्म-सापेक्ष, उत्पाद-व्यय सापेक्ष, और भेद रूप होने से, मैं नहीं हो सकता। मैं तो एकमात्र सामान्य-अभेद-नित्य-और एकरूप भाव स्वरुप ही था, हूँ, और हमेशा रहुँगा। साथ ही में सम्यक्त्वाचरण (स्वरूपाचरण) चारित्र का प्रयत्नपूर्वक अंगीकार करें।

**१४. अनंतानुबंधी क्रोध किसे कहते है?**

डॉ. हुकमचंद भारिल्ल अपनी 'धर्म के दस लक्षण' इस अत्यंत लोकप्रिय किताब में लिखते है 'आत्मा की अरूचिरूप क्रोध' को अनंतानुबंधी क्रोध कहते है। मान्यता में आत्मा के प्रति अरुचि चरित्र में अनंतानुबंधी क्रोध का निमित्त है। इसे और तरीकों से भी परिभाषित किया जा सकता है। इस विश्व में मेरे लिए कोई भी अस्तित्व अनिष्ट नहीं है (निश्चय से और व्यवहार से एकमात्र राग अनिष्ट है), ऐसी श्रद्धा के अभाव के निमित्त से जो क्रोध (किसी

कल्पित अनिष्ट का बुरा होने की चाह रूप परिणाम) उत्पन्न होता है उसे अनंतानुबंधी क्रोध कहते हैं

**१५. अनंतानुबंधी मान किसे कहते है ?**

शरीरादि पर पदार्थ एवं अपनी अपनी विकारी अल्पविकसित अवस्थाओं में मान्यता में एकत्वबुद्धि के निमित्त से हुए मान को अनंतानुबंधी मान कहते है। यहाँ ध्यान देने वाली बात ये है की अनंतानुबंधी मान मिथ्यात्वी को ही होता है इसलिए उसके पास अविकारी विकसित अवस्थाएं होती ही नहीं। अथवा इस विश्व में मेरे लिए कोई भी अस्तित्व अनिष्ट नहीं है (निश्चय से और व्यवहार से एकमात्र राग अनिष्ट है), ऐसी श्रद्धा के अभाव के निमित्त से जो मान (किसी कल्पित अनिष्ट को अपने से निचा दिखाने की चाह) उत्पन्न होता है उसे अनंतानुबंधी मान कहते है।

**१६. अनंतानुबंधी माया किसे कहते है ?**

आत्मा के सरल स्वभाव के विरुद्ध विपरीत परिणमन करने की मान्यतामें चाह अनंत वक्रता हैं। इस मिथ्याश्रद्धान के निमित्त चरित्र में उत्पन्न होनेवाली माया को अनंतानुबंधी माया कहते है। अथवा इस विश्व में मेरे लिए कोई भी अस्तित्व इष्ट नहीं है (निश्चय से और व्यवहार से एकमात्र वीतरागता इष्ट है), ऐसी श्रद्धा के अभाव के निमित्त से जो माया (किसी कल्पित इष्ट को छल से पाने की चाह) उत्पन्न होता है, उसे अनंतानुबंधी माया कहते है।

**प्रेषक– प्रो. डॉ. शिरीष रायबागकर,**
अहिल्यानगर, मोबा. ९९६०३७९०४७

**( क्रमशः )**

# मागील अंकाविषयी अभिप्राय....

*

२०व्या शतकातील प्रथम दीक्षित महिला १०५ श्री पार्श्वमती अम्मा यांच्यापासून आजतागायत धार्मिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या सर्वच महिलांचा आपण जो परिचयात्मक अंक काढला व त्यासाठी ज्यांनी प्रयत्न केले त्या सर्वांना माझे मनोमन आभार. जुन्या काळातील विदुषी वैधव्यातही समाजकार्य व शिक्षण क्षेत्रात अग्रेसर कशा होत्या याचे संकलन खूपच सुंदर कौतुक करण्यासारखे आहे. आपल्या समाजातली जुन्या काळापासून परिस्थितीशी दोन हात करून समाजसेवेला वाहून घेतलेल्या आर्यिका किंवा पंडितांचा परिचय झाला नि नकळत मन नतमस्तक झाले. त्यांच्यापुढे आपण समाजकार्यात किती नगण्य आहे याची जाणीव झाली. पण त्याचवेळी आपल्या कर्तव्याची ओळख झाली. अंक अतिशय स्पृहणीय आहे. ज्यांनी यासाठी अपार मेहनत घेतली त्यांना मानाचा मुजरा.

विपुलताई, सहज पण अकल्पित अशा विषयावर आपले प्रभुत्व, माझ्या साधारण कार्याची घेतलेली दखल व व्यक्त केलेले मनोगत याबद्दल खूप खूप आभारी आहे. साध्या व सोप्या कार्य पद्धतीने जीवनात आनंद मिळविता येते हे सगळ्या लेखकांनी लिहिलेल्या मनोगतातून व्यक्त होते. सर्व लेखकांना मनापासून अभिवादन. **सरला मुधोळकर** यांचे अंकाविषयीचे मनोगत.

*

मासिक सन्मतीचा संपूर्ण अंक वाचला. प्रत्येक लेखात स्त्रियांच्या कर्तृत्वाला केलेला सलाम काबीले तारीफ आहे. नावे तर सगळ्यांची ऐकली होती पण त्यांनी केलेले कर्तृत्व व त्या काळात देखील धार्मिक आचरणातून केलेली समाजसेवा खरोखर अभिनंदनास पात्र आहे. संपादकांनी व तुम्ही लेखकांनी संपादित केलेली त्या सर्वांबद्दलची माहिती अभ्यासपूर्ण तर आहेच पण समाजाला जाणून घेणेदेखील तेवढेच आवश्यक आहे. त्याबद्दल संपादकांचे व तुम्हा सर्व लेखकांचे खूप खूप अभिनंदन!

**–समता देवलसी,** अंजनगावसुर्जी

# ‘सोलहकारण भावना भाय....!’

(लेखांक १३)

**हर्षा वेखंडे, नागपूर,**९८२२६९०८६०

## बहुश्रुत भक्ती भावना (भाग ३)

श्रुतपंचमीचा दिवस होता. चेतनाचं घर आज पहाटेच जागलं. सर्वांची लगबग सुरू होती. छोटा सक्षम आणि संवेग दोघांची धावपळ नजरेत भरत होती कारण रोज सकाळची शाळा असल्याने मंदिरात जाणं शक्य होत नव्हतं, पण आज श्रुतपंचमीच्या पर्वावर मात्र अगदी पहाटे मंदिरात जाऊन दर्शन करायचं हा पूर्ण परिवाराचा प्रण होता. प्रातर्विधी आटोपून पूर्ण परिवार दर्शनासाठी निघाला. देवदर्शनानंतर प्रवेश झाला तो स्वाध्याय कक्षात! अत्यंत शांत गंभीर मुद्रेत हातात लेखणी असलेली आणि समोर शिष्य परिवाराला उद्बोधन देत असलेल्या उपाध्याय परमेष्ठींच्या तैलचित्रावर नजर येऊन थांबली... करकमलांसोबत नजरही झुकली.... वळली ती स्वाध्याय कक्षातील ग्रंथसंपदेकडे....!

धवला भाग १ ते १२, श्री समयसार, श्री प्रवचनसार, श्री पंचास्तिकाय संग्रह... रांगेत ठेवलेली ही शास्त्रे, १२ अंग आणि १४ पूर्वांची आठवण करून देऊ लागली.

न राहवून संवेग अभिमानाने म्हणाला, ‘आम्हाला कळला हं १२ अंग आणि १४ पूर्वांचा विषय!’

‘संवेग, १२ अंग आणि १४ पूर्व हे आहे अंग प्रविष्ट ज्ञान. अरहंत भगवंतांनी प्रतिपादित केलेले आणि ते ऐकून गणधरांनी रचना करून ग्रंथरूप केलेले हे द्वादशांग श्रुत, त्यांना अंग प्रविष्ट म्हणतात.

श्रुतज्ञानाचे दोन भेद आहेत-अंगप्रविष्ट व अंगबाह्य.

‘आजी, अंग प्रविष्टचे बारा प्रकार आपण बघितले. आता आम्हाला अंगबाह्य म्हणजे काय आणि त्याचे किती प्रकार आहेत ते समजावून सांगा ना!’ संवेग म्हणाला.

‘अंगबाह्य हे गणधर रचित बारा अंग तर नाहीत, पण त्या बारा अंगांच्या बाहेरचे आहेत; म्हणून यांना अंगबाह्य म्हणतात. करुणानिधी आचार्यांनी मंद बुद्धीच्या शिष्यांना समजावं म्हणून द्वादशांगांवर आधारित शास्त्र रचना केली, तिला अंगबाह्य किंवा प्रकीर्णक असे म्हणतात.

प्र – विशेष

कीर्ण – विखुरलेले/ पसरलेले

क– ग्रंथ.

द्वादशांग अर्थात बारा अंगांना पूरक असे विविध विषयांवर विखुरलेल्या स्वरूपात सांगितलेले ग्रंथ त्यांना प्रकीर्णक असे म्हणतात. मुख्य आगमाला पूरक लघुस्वरूपात असलेले ग्रंथ म्हणजे प्रकीर्णक. असे प्रकीर्णक १४ आहेत.

सामायिक, स्तवन, वंदना, प्रतिक्रमण, वैनयिक, कृतिकर्म, दशवैकालिक, उत्तराध्ययन, कल्प्यव्यवहार, कल्प्याकल्प्य, महाकल्प्य, पुंडरिक, महापुंडरिक, अशीतिका असे १४ प्रकीर्णक आहेत.

आता पुढे एक एक प्रकीर्णकाचा विषय आपण समजून घेऊ या.

१) सामायिक प्रकीर्णक :-

सामायिक– सम्+अय, सम्यक्प्रकाराने ग्रहण करणे म्हणजे सामायिक. राग-द्वेषाने रहित जीवाचा भाव सामायिक होय. सामायिक प्रकीर्णकात मिथ्यात्व-कषाय आदिंच्या अभावरूप सामायिकाचे वर्णन आहे. नाम, स्थापना, द्रव्य, क्षेत्र, काल, भाव अशा भेदरूपाने सहा प्रकाराने सामायिक समजावून सांगणारं हे सामायिक प्रकीर्णक आहे.

नाम सामायिक :- वस्तूंच्या इष्ट-अनिष्ट नावांमध्ये

राग-द्वेष न करणे हे नाम सामायिक होय. कुठलंही नाव येवो, त्यात विषमता न करणे म्हणजे नाम सामायिक.

स्थापना सामायिक :- स्त्री-पुरुषांच्या सुंदर किंवा कुरूप आकारांमध्ये राग-द्वेष न करणे, काष्ठ, पाषाण किंवा कुठल्या चित्र आदींच्या स्थापनेमध्ये आसक्तीचे किंवा द्वेषाचे परिणाम न करणे अर्थात समता भाव ठेवणे हे स्थापना सामायिक आहे.

द्रव्य सामायिक :- इष्ट-अनिष्ट रूप चेतन-अचेतन आदि नाना प्रकारच्या द्रव्यांमध्ये राग-द्वेष न करणे म्हणजे द्रव्य सामायिक.

क्षेत्र सामायिक:- गाव, नगर, देश, पर्वत, वनराई, जंगल आदि इष्ट-अनिष्ट क्षेत्रांमध्ये आवड-निवडीचे परिणाम न करणे म्हणजे क्षेत्र सामायिक होय.

काल सामायिक :- वसंत आदि सहा ऋतूंमध्ये शुक्ल-कृष्ण पक्षात, दिवसा-रात्री, ग्रह-नक्षत्र आदि काळात राग-द्वेष न करणे म्हणजे काल सामायिक.

भाव सामायिक :- ज्ञान परिणामांमध्ये ज्ञान स्वभावी आत्मा झळकणे. जीवाचे परिणाम स्व-आत्म्यामध्ये निजभावरूपाने लागणे. अशा परिणामांचं नाव भाव सामायिक होय.

'आजी, आतापर्यंत मला असं वाटत होते की, सामायिक करणे म्हणजे सामायिक पाठ म्हणणे. बस एवढेच...!'

'संवेग, सामायिक पाठ यासाठी म्हटला जातो की, परिणामांमध्ये समता भाव यावा. सामायिक पाठाचे शब्द उच्चारणे हे कारण आहे आणि कार्य व्हावं ते समता भावाचं.'

'आजी, फार महत्त्वाची गोष्ट कळली मला. कधी कोणाचं नाव आवडत नाही, तर कोणतं गाव आवडत नाही, कुठलं चित्र खूप आवडतं, कुठली वस्तू अजिबात नावडते. अशा दोन टोकांवर झुलू नये आपण, असं सामायिक प्रकीर्णक सांगतं. आजी, फार दिलासा देणारं आहे हे प्रकीर्णक!

२) स्तवन प्रकीर्णक :- या प्रकरणात २४ तीर्थंकरांचे स्तवन केले आहे. त्यात त्यांचं नाव , संस्थान, उंची, रंग आदि वर्णन आहे. तीर्थंकर भगवंतांचे पंचकल्याणक, ३४ अतिशय, आठ प्रातिहार्य, परम औदारिक दिव्य शरीर, समवशरण धर्मसभा आदिंच्या वर्णनातून तीर्थंकर भगवंतांचा महिमा गायला आहे. या प्रकीर्णकाचं नाव चतुर्विंशतिस्तवन असंही आहे.

३) वंदना प्रकीर्णक :- समूह रूपाने स्तुती करणे त्याला स्तवन म्हणतात, तर एकाच तीर्थंकरांची स्तुती करणे त्याला वंदना म्हणतात. एका तीर्थंकरांच्या आश्रयाने किंवा एका तीर्थंकरांच्या अवलंबनरूप भगवंताच्या प्रतिमेचे स्तवनरूप वर्णन अर्थात् भगवंताचे महात्म्य या प्रकीर्णकात वर्णिलं आहे.

४) प्रतिक्रमण प्रकीर्णक :- प्रमादजनित पूर्वकृत दोषांचं निराकरण करण्याचं वर्णन या प्रकीर्णकात आहे, जेणेकरून प्रमादाने लागलेले दोष दूर होतील. प्रतिक्रमणाचे एकूण सात भेद आहेत. - दैनिक, रात्रिक, पाक्षिक, चातुर्मासिक, सांवत्सरिक, ऐर्यापथिक, उत्तमार्थ

१) दैवसिक (दैनिक)- दिवसभरातील दोष दूर करण्यासाठी संध्याकाळी आत्मावलोकन करणं, ते दैवसिक प्रतिक्रमण आहे.

२) रात्रिक :- रात्री लागलेल्या दोषांना दूर करण्यासाठी पहाटे केले जाणारे रात्रिक प्रतिक्रमण.

३) पाक्षिक :- पंधरा दिवस म्हणजे एका पक्षात झालेल्या प्रमादांच्या निराकरणासाठी पंधराव्या दिवशी आत्मावलोकन करण्याला पाक्षिक प्रतिक्रमण म्हणतात.

४) चातुर्मासिक :- चार महिन्यांमध्ये लागलेल्या दोषांना दूर करण्यासाठी चौथ्या महिन्याच्या शेवटच्या दिवशी आत्मावलोकन करणे, ते चातुर्मासिक प्रतिक्रमण होय.

५) सांवत्सरिक :- एका वर्षात लागलेल्या दोषांच्या निराकरणासाठी वर्षाच्या अंतिम दिवशी आत्मा-वलोकन करणे, ते सांवत्सरिक प्रतिक्रमण आहे.

६) ऐर्यापथिक :- मार्गात गमन करते वेळेस लागलेल्या हिंसादि दोषांना दूर करण्यासाठी

गमनानंतर स्थिर झाल्यावर आत्मावलोकन करणे, ते ऐर्यापथिक प्रतिक्रमण होय.

७) उत्तमार्थ :- वर्तमान संपूर्ण जीवनात लागलेल्या दोषांना दूर करण्यासाठी मरणकाळी समाधीच्या वेळेस आत्मावलोकन करणे, ते उत्तमार्थ प्रतिक्रमण.

या सात प्रतिक्रमणांना भरतादि क्षेत्रांत, दुषमादी काळात, सहा संहननसहित जीवांच्या अपेक्षेने करण्याची विधी सांगणारे शास्त्र म्हणजे प्रतिक्रमण प्रकीर्णक आहेत.'

'आजी, दिवस-रात्र जाणता-अजाणता कितीतरी चुका घडत असतात ना आपल्या हातून....! त्या चुकांच्या दुरुस्त्यांसाठी अत्यंत सजग राहावं, यासाठी किती सखोल वर्णन केलं आहे प्रतिक्रमणाचं!!' इति संवेग.

'अगदी बरोबर! जिनवाणी ममतामयी आहे म्हणूनच जिनवाणी माता म्हटलं जातं. आईच्या ममतेने ती चुकांचं निरसन शिकवते बघा..' शारदा आजी म्हणाल्या.

'चला वळू या, पुढलं प्रकीर्णक समजून घेण्याकडे!'

५) विनय प्रकीर्णक :-

विनय म्हणजे आदर सन्मान करणे. ज्यात विनयाचं वर्णन आहे ...विनय कोणाचा करायचा आणि कशाप्रकारे करायचा हे सांगणारं वैनयिक प्रकीर्णक होय.

विनय प्रकीर्णकात दर्शन, ज्ञान, चारित्र, तप आणि उपचार स्वरूप पाच प्रकारच्या विनयांचं वर्णन आहे. 'विनयसंपन्नता' या भावनेत आपण या पाच प्रकारच्या विनयांचं विस्ताराने वर्णन बघितलं आहे. पाच प्रकारचे विनय आत्मशुद्धीचे अलंकार आहेत.

१) दर्शन विनय- जसा पहाटेचा सूर्य अंधार दूर करतो, तसा दर्शन विनय आत्म्यातील मिथ्यात्व व अज्ञानाचा अंधार दूर करतो. अरिहंत- सिद्ध- आचार्यांप्रति आदर, श्रद्धा व नम्रता हीच त्याची सुवर्ण किरणे! सम्यग्दर्शनाचे बीज यातून रुजते.

२) ज्ञान विनय- ज्ञान हा दीपक आहे, पण विनय नसल्यास तो अहंकाराची ज्वाला होतो. गुरु, शास्त्र व ज्ञानीजनांप्रति नम्रता ठेवून मिळविलेले ज्ञान आत्म्याला उजळवणारे चंद्रप्रकाश बनतं- शीतल, शांत आणि मार्गदर्शक.

३) चारित्र विनय- चारित्र म्हणजे आचरणाची गंगा. संयम व शील यांच्या काठांनी वाहणारी चारित्र-गंगा आत्म्याच्या मलिनतेला धुवून निमळं करते. चारित्र धारण करणाऱ्यांच्या प्रति विनय भाव असावा.

४) तप विनय- तप म्हणजे अग्नी, पण विनय नसल्यास तो दाह निर्माण करतो. तपधारी मुनिराज असतात, जे कर्मांचे मळ वितळवून आत्म्याला तेजस्वी बनवतात. त्या मार्गावर आपणही चालावे हे मनात धरून तपधारींच्या प्रति आदराचे, विनयाचे परिणाम असावेत.

५) उपचार विनय- हा विनय म्हणजे माळेतील धागा, जो दिसत नाही, पण सगळे मणी एकत्र धरून ठेवतो.

वाणीतील सौजन्य, वर्तनातील नम्रता, सेवाभाव व आदर यांनी साधनेची सुगंधी पुष्पमाला बनते.

सारांश हा की, हे पाचही प्रकारचे विनय मिळून आत्म्याला श्रद्धेची मुळे, ज्ञानाची पाने, चारित्राची फुले, तपाची फळे आणि उपचारांची सुगंधी हवा देतात आणि अखेरीस मोक्षमार्गावर नेणारे दिव्य वृक्ष घडवतात. अशा विनयासंबंधीचे वर्णन वैनयिक प्रकीर्णकात केलं आहे.

६) कृतिकर्म प्रकीर्णक :-

कृती म्हणजे क्रिया आणि कर्म म्हणजे विधान. मुनींच्या क्रियांचे संक्षेपात वर्णन ज्यात आहे, ते कृतिकर्म प्रकीर्णक होय. अरहंत, सिद्ध, आचार्य, उपाध्याय, साधू, जिनप्रतिमा, जिनमंदिर, जिनागम, जिनधर्माच्या वंदनेसाठी तीन प्रदक्षिणा, चार शिरोनती, तीन शुद्धी, दोन नमस्कार, बारा आवर्त इत्यादी नित्य नैमित्तिक क्रियांचं वर्णन या प्रकीर्णकात केलं आहे.

वंदना करणे, तीन प्रदक्षिणा देणे, पृथ्वीला सर्व अंग लावून दोन अष्टांग नमस्कार करणे, शिर झुकवून चार नमस्कार करणे, प्रत्येक नमस्कारात तीन-तीन वेळा हात जोडून गोल फिरवून बारा आवर्त करणे आणि आपल्या हृदयात भगवंतांना

स्थापन करणारे एक आवाहन करणे, तसेच समाप्तीवर एक विसर्जन करणे आणि समाप्ती करणे, या दैनिक क्रियांचं वर्णन या प्रकीर्णकात आहे.'

'आजी, मी अशा प्रकारे वंदना करताना मंदिरात काही लोकांना बघितलं आहे... त्यावेळेस अनेक प्रश्नचिन्हं माझ्या मनात आली होती. कोणी हात जोडून नमस्कार करतात तर कोणी मस्तक झुकवून...कोणी तर जमिनीवर सर्वांग टेकवून नमस्कार करतात..आता कळलं की, आचार्यांनी या सगळ्या विधींचं वर्णन केलं आहे प्रकीर्णकात.' संवेग म्हणाला.

' अगदी खरं!' आजी उत्तरल्या. 'अत्यंत विस्तृत आहे खरेच जिनवाणी!!'

७) दशवैकालिक प्रकीर्णक :-

देश-काळात करण्यायोग्य जी कार्ये आहेत, त्यांचं नाव आहे विकाल. या प्रकरणात साधूंचे आचार तथा आहारशुद्धींचं दहा विशेषकाळांसंबंधी वर्णन केले आहे.

८) उत्तराध्ययन प्रकीर्णक :-

प्रश्नांच्या उत्तरांना जिथे वर्णिलं आहे, ते उत्तराध्ययन प्रकीर्णक आहे. मुनी अवस्थेत चार प्रकारचे उपसर्ग, बावीस प्रकारचे परिग्रह सहन करण्याचे विधान, त्यांचं फळ तथा त्या संबंधित प्रश्नांची उत्तरं यांचं वर्णन या प्रकीर्णकात आहे.

९) कल्प्य व्यवहार प्रकीर्णक :-

कल्प्य म्हणजे योग्य आचरण आणि व्यवहार म्हणजे प्रवृत्ती करणे. या प्रकीर्णकात साधूंच्या आचरणाचं विधान, अयोग्य आचरणाच्या सेवनाचं प्रायश्चित्त घेण्याची विधी इत्यादींचे वर्णन आहे.

१०) कल्प्याकल्प्य प्रकीर्णक :-

कल्प्य म्हणजे योग्य आणि अकल्प्य म्हणजे अयोग्य. द्रव्य-क्षेत्र-काल-भावाच्या अपेक्षेने या वस्तू साधूंना योग्य आहेत, तर या वस्तूंमध्ये काही दोष आहेत, या अयोग्य आहेत; अशा प्रकारे क्रमाने योग्य-अयोग्य क्रियांचे ग्रहण-त्याग यांचं वर्णन या प्रकीर्णकात केलं आहे.

११) महाकल्प्य प्रकीर्णक :-

या प्रकीर्णकात जिनकल्पी उत्कृष्ट संहननधारी महामुनींची योग्य द्रव्य-क्षेत्र-काल-भावाच्या प्रभावाने उत्कृष्ट चर्या कशी असावी, प्रतिमा योग, आतापन योग, त्रिकाल योग आदिंचे आचरण तथा स्थविरकल्पी साधूंना दीक्षा, शिक्षा, संघाचे पोषण, यथायोग्य शरीराच्या क्रिया, आत्मसंस्कार, सल्लेखना तथा समाधी काळातील उत्तम आराधना यांचं वर्णन आहे.

थोडक्यात मुनिराजांनी कोणत्या क्षेत्रात राहावं, कुठल्या काळात काय करावं, त्यांचे भाव कसे असावेत इ.उत्कृष्ट क्रियांचं वर्णन केलं आहे.

१२) पुंडरिक प्रकीर्णक :-

भवनवासी, व्यंतरवासी, ज्योतिष्क, वैमानिक या चार प्रकारच्या देवांसंबंधीचं वर्णन अर्थात या देवांमध्ये उत्पत्तीचे कारण, त्यांचं वैभव, तिथे उत्पन्न झालं तर काय मिळतं, उत्पन्न होण्याची कारणे अर्थात दान, पूजा, तपश्चरण, अकाम निर्जरा, सम्यक्त्व व संयम आदींचे वर्णन येथे केलेलं आहे.

१३) महापुंडरिक प्रकीर्णक :-

महा म्हणजे महान आणि पुंडरिक म्हणजे देव. महान ऋद्धिधारी वैमानिक इंद्र, प्रतींद्र, अहमिंद्र आदी देवांमध्ये जीव कुठल्या कारणाने उत्पन्न होतात, त्या तपविशेषांसंबंधीचं वर्णन महापुंडरीक प्रकीर्णकात केलेलं आहे.

१४) निषिद्धिका प्रकीर्णक :-

प्रमादजन्य दोषांचं निवारण करणाऱ्या, अनेक प्रकाराने प्रायश्चित्त घेण्याच्या विधींचे वर्णन यात आहे. दोषांचं निषेध करण्याच्या कारणाने या प्रकीर्णकाला निषिद्धिका प्रकीर्णक असं म्हणतात.

अशाप्रकारे द्वादशांग शास्त्रांचा विस्तार आहे.

जिनवाणीचे १२ अंग हे अंग प्रविष्ट आणि १४ प्रकीर्णक अर्थात् अंगबाह्य रूपाने वर्णन आपण बघितलं...' शारदा आजी म्हणाल्या.

'इतक्या विशाल ग्रंथ समुदायाचे ज्ञान असणारे ते उपाध्याय परमेष्ठी होत. बरोबर ना आजी?' संवेग म्हणाला.

'अगदी बरोबर! उत्तम तपधारींना द्वादशांग शास्त्रांचं ज्ञान होतं. जे स्वतः अभ्यास करतात, स्वाध्याय करतात आणि बुद्धिमान शिष्यांना शिकवतात त्या बहुश्रुतांची भक्ती संसारपरिभ्रमणाचा नाश करणारी आहे. शास्त्रांची भक्ती देखील बहुश्रुतभक्ती आहे.'

'बहुश्रुत भावना भावण्यासाठी आपण नेमकं काय काय करावं..?' विचारमग्न संवेगने प्रश्न उचलला.

'गुणांमध्ये अनुराग करणे, ती भक्ती आहे. जे शास्त्रांमध्ये अनुराग करतात, स्वतः अभ्यास करतात, स्वाध्याय करतात, शास्त्राचा अर्थ इतरांना शिकवतात, पैसे खर्च करून शास्त्र लिहितात, आपल्या हाताने लिखाण करतात, शास्त्रांचं शोधन करतात, स्वाध्याय करू इच्छिणाऱ्यांना शास्त्र उपलब्ध करून देतात, प्रवचन करतात, पाठशाळा चालवतात, शास्त्र वाचनासाठी, स्वाध्यायासाठी जागा उपलब्ध करून देतात त्यांचा विनय करावा, असे परिणाम आपलेही असावेत. हे सारे परिणाम बहुश्रुतभक्तीचे परिणाम आहेत. अशा परिणामांच्या फलरूपाने ज्ञानावरण कर्मांचा नाश होतो.

ग्रंथांना, शास्त्रांना मन प्रसन्न होईल अशा प्रकारे कागद किंवा कापडाचे कव्हर चढवणे, शास्त्र पूजा करणे, पाच इंद्रियांच्या विषयांपासून मनाला अलिप्त करून जे शास्त्र स्वाध्याय करणे या गोष्टी जे करतात, ते संपूर्ण जिनवाणीचे पारगामी होऊन केवलज्ञानाला प्राप्त होतात.

अशाप्रकारे द्वादशांग रूपात अंग प्रविष्ट आणि प्रकीर्णक रुपात अंगबाह्य श्रुतज्ञान लक्ष्मी विराजमान आहे. हे वैभव जनमानसापर्यंत पोहोचवणारे उपाध्याय परमेष्ठी होत. नमोस्तुते!

शारदा आर्जीसोबत सर्वांनी जिनवाणीसह उपाध्याय परमेष्ठींना मनोभावे नमस्कार केला.

**( क्रमशः )**

---

## मागील अंकाविषयी अभिप्राय....

*

सन्मतिचा मार्च-एप्रिलचा अंक महिला दिनाच्या निमित्ताने धर्मक्षेत्र उजळवून टाकणाऱ्या कर्तृत्ववान महिलांच्या स्मृती नव्या पिढीसमोर आणणारा आहे. बहुतेक प्रत्येकीच्या जडणघडणीत कारंजाचे श्री कंकुबाई श्राविकाश्रम आधारस्तंभ आहे, असे दिसून येते . येथील शिक्षणाचे वैशिष्ट्य म्हणजे अनेकांना सुसंस्कारित करण्याचे बीज प्राप्त होणे हे होय . सर्वांचे प्रेरणास्थान गुरुदेव श्री समंतभद्र महाराज होत. त्यांच्या सान्निध्यात आलेल्या प्रत्येकाच्या जीवनाचे सोने झाले म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही प्रत्येक स्त्री रत्नाचा परिचय देणारे सर्वलेख वाचनीय आहे. अशा उत्तमोत्तम लेखांचे हे संकलन करणाऱ्या संपादक मंडळाचे अभिनंदन करावे ते थोडेच होईल.

**ज्योतीने ज्योत उजळते.....** शतकभरातील महिलांच्या धार्मिक योगदानाचा आढावा नेटक्या शब्दात असलेला लेख वाचून त्या त्या व्यक्तींच्या आठवणींसोबत आदराची भावना, त्यांच्या ज्ञानपिपासा, ज्ञानदानाची तळमळ लक्षात आली. या सर्व आदरणीय महिलांना प्रकाशात आणल्याबद्दल विपुलचे कौतुक वाटते .

आ. शांतताई कान्हेड देऊळगावराजाला आल्या होत्या तेव्हा त्यांनी सामान्य गुणांचा परिचय सुंदर समजावून सांगितला होता त्यांच्याबद्दलचा सौ. उल्काचा लेख वाचून त्या सुंदर स्मृती जागृत झाल्या.
पूर्ण अंकच वाचनीय, संग्रहणीय आहे. पुढील काळासाठी ऐतिहासिक ऐवज ठरणारा आहे . शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते

दिव्यत्वाची जेथे प्रचीति। तेथे कर माझे जुळित।

**सौ. ऋजुता जिंतुरकर,** देऊळगांवराजा, ९१ ९४२०२ ३३८९४

# पट्टमहादेवी– शब्दांपलिकडील अन्वयार्थ

(लेखांक - २८)

**विपुल खेडकर,** नागपूर

राणी लक्ष्मीदेवी काय निर्णय घेतात ? जन्मदाता नसला तरी जन्मापासून आतापर्यंत मानसिक आधार देणारा पिता की ज्याच्यासोबत सात पावले चालून अखंड सौभाग्याची कामना केली आहे तो पती ? दोलायमान अवस्थेत असणाऱ्या लक्ष्मीदेवींना स्थिर निर्णय घ्यायला जमेल कां? वाचू या ह्या भागात !

**पतीची पावले हाच पत्नीधर्म**

लक्ष्मीदेवींना कळेना काय निर्णय घ्यावा ? वडिलांशी चर्चा करून ठरवावे, तर वडिल आचार्यांजवळ यदुगिरीला ! काय करावे.... पतीच्या या निर्णयात साथ दिली नाही तर, कदाचित कायमचे पतिविरहात जीवन जगावे लागेल.... शिवाय आपण बघितलेले स्वप्न, आपला राजकुमार सिंहासनाधीन होण्याचे, स्वप्नच राहील, प्रत्यक्षात येणार नाही. शिवाय पतीशिवाय स्त्री.... सगळीकडूनच मानहानी ! नकोच ते ! वडिलांना पुढे समजावून सांगता येईल.. पण आज मात्र पतीचा मार्ग निवडणे श्रेयस्कर !

मनाशी निश्चय करून दुसऱ्या दिवशी पहाटेच राजदम्पतीने यादवगिरी वरून दोरसमुद्रकडे प्रयाण केले. रस्त्यात यदुगिरीला लक्ष्मीदेवींची आपल्या वडिलांशी सन्निधानांच्या सोबतच भेट झाली. पितापुत्री मौनपणे एकमेकांना बघत होते की, महाराज म्हणाले,

'आम्ही दोरसमुद्रला निघालो आहोत. सध्या तरी यादवपुरीला परतण्याचा विचार नाही... म्हणून यादवपुरीत महालाचा एक भाग तुमच्यासाठी ठेवला असून बाकी भागात दण्डनायक राहतील किंवा तुमच्या इच्छेनुसार तुम्हाला जेथे रहायचे असेल तेथे उचित व्यवस्था केली जाईल.'

'ठीक आहे !' एवढेच उत्तर देऊन तिरूवरंगदासांनी तेथून काढता पाय घेतला .

**मनाची कवाडे बंद तर.....**

दोनच दिवसात राजदाम्पत्य श्रवणबेळगोळ येथे पोहोचले. सन्निधानांची पावले जिकडे पडतील तिकडे लक्ष्मीदेवी जात होत्या. भगवान बाहुबलींच्या चरणाशी महाराज पोहोचले. राणींचे पाऊल पुढे पडेना, मिटलेले डोळे उघडेनात ! मनात जो तिरस्कार भरला होता तो जाता जाईना ! महाराजांनी बाहुबली भगवंतांची स्तुती, पूजा प्रारंभ केली. त्यांची ती तल्लीनता बघून हळूहळू राणी लक्ष्मीदेवी त्यांच्या बाजूला स्थानापन्न झाल्या, पूजेत सहभागी झाल्या. मात्र दुसऱ्या दिवशी सवती गंधवारण बसदिमधे पोहोचल्यावर महाराजांनी त्यांना म्हटले,

'याच मंदिराच्या प्रतिष्ठापनेसाठी तुम्ही आला नाहीत, याच आपल्या नरसिंहाच्या तब्येतीचे कारण पुढे केलेत.....'

'वैष्णव सोडून इतर कोणत्याही मंदिरात माझे भावच होत नाहीत... ही मंदिरे मला देवमंदिरे वाटतच नाहीत..... त्यातच हे मंदिर तर माझा सर्वनाश व्हावा म्हणूनच निर्माण झाले ना... मग मला येथे यावेसे कसे वाटेल?'

'कोणी सांगितले तुम्हाला की, हे मंदिर तुमचा नाश व्हावा म्हणून पट्टमहादेवींनी बांधले ?'

' त्याच्या नावातच अर्थ स्पष्ट होतो, तर सांगण्याची आवश्यकता काय?'

' बघा, विचार न करता, न समजता बोलाल तर आजपर्यंत राजमहालात असणारी शांती संपुष्टात येईल. पट्टमहादेवी अहिंसेच्या पूजक आहेत.

त्यांच्या मनातही असा विचार येऊ शकत नाही... सवतींच्या मनात जर माझ्यामुळे काही क्षोभ निर्माण होत असेल तर तो दूर व्हावा एवढ्याच मंगल भावनेने त्यांनी मंदिराची निर्मिती करवली आहे... तुम्हाला दर्शन करायचे असेल तर करा अन्यथा....' एवढे बोलून झपझप पावले टाकत ते मंदिरात गेले. पूजेत एकाग्र झाले. काही वेळ ध्यानात मग्न होऊन राणींची वाट न बघता निघाले.

नियोजित रीतीने प्रवास पूर्ण करून दोरसमुद्रच्या राजमहालाच्या द्वारापाशी आले तर स्वतः पट्टमहादेवी ओवाळणीचे ताट घेऊन उभ्या दिसल्या. महाराजांचा शीण जणू नाहीसाच झाला! ते म्हणाले, 'राजकुमार आजारी असतांना याची काय गरज होती?'

' असे कसे? राजकुमार नरसिंह प्रथमच आले आहेत ना! त्यांचे स्वागत नको कां करायला !'

महाराजांनी केवळ एक कटाक्ष राणी लक्ष्मीदेवीकडे टाकला. त्यांनी मान खाली घातली. चेहऱ्यावर अस्फुट हसू पसरलेले महाराज तोवर राजकुमार विनयादित्य जवळ पोहोचले देखील !

वैद्यराजांशी बोलून, राजकुमारांच्या डोक्यावर हात ठेवून त्यांच्याशी वार्तालाप करून ते पुढच्या कामाला लागले.

**वाक्बाणांचे तीर सुटले! ....**

राणी लक्ष्मीदेवींच्या मनात काही विषय बोचत होतेच.. एके दिवशी संधी मिळताच त्यांनी पट्टमहादेवीजवळ श्रवणबेळगोळ येथील नूतन प्रतिष्ठित मंदिराच्या नावाचा विषय काढलाच आणि म्हटले,

' सवतींचा नाश व्हावा म्हणून तर सवति गंधवारण मंदिर बांधले ना.....!'

पट्टमहादेवी बघतच राहिल्या, कोणी असा कसा अर्थ काढू शकतो ? तरी त्यांनी शांतपणे विचारले,' तुम्ही माझ्यावर सवती मत्सराचा आरोप लावीत आहात. मी सवत वाटते कां? .....'

' मला कां विचारता ? बेळगोळाच्याच्या पहाडावर जे मंदिर निर्माण केले, मोठे शिलालेख कोरले ते सगळे साक्षी आहेत ना !'

' सवतीपणा दाखवण्यासाठी मला तुमच्याबद्दल काही असंतोष असायला हवा ना ?'

' ते मला कसे माहित असणार ? आपला माझ्यावर आणि माझ्या वडिलांवर विश्वास नाही, सतत आमचा तिरस्कार करता.....'

' विश्वास आपल्या वागणुकीने, व्यवहाराने प्राप्त करावा लागतो, विकत मिळत नाही !'

' मी तुमच्याप्रमाणे ज्ञानी नाही, पण सन्निधानांच्या मनात माझ्याबद्दल आणि माझ्या वडिलांबद्दल शंका निर्माण करण्याचे काम तुम्हीच करता आहात !'

' मी कां करेन?'

' किती वेळा सांगू ?'

' कारण तर कळायला हवे ना....'

' सवतिगन्धवारण हे नाव आणि तो शिलालेख !'

'तर माझ्यावर सवतिमत्सराचा आरोप लावीत आहात? हा मत्सर केवळ तुमचाच की......'

त्यांचे बोलणे मधेच तोडत लक्ष्मीदेवी म्हणाल्या, ' त्यांना मुले झाली असती तर आपण त्यांचा देखील केला असता....मला पुत्रप्राप्ती झाली हेच या मत्सराचे कारण आहे, हे स्पष्टच आहे!' बोलतांना त्यांचा चेहरा लाल झाला होता.

' लक्ष्मी, तुमच्या मनात कोणी काहीतरी भरवले आहे... तुम्हाला पुत्र झाला तर मी कां जळावं? तुम्हाला असं कां वाटतं की, मी माझ्याशिवाय कोणाचं मातृत्व सहन करीत नाही?'

' कारण सगळ्या मातांची मुले होयसळ राजवंशाची नसतात...'

' होयसळ राजवंशाची सगळीच मुले पुढे जाऊन राजा बनत नाही ना...' पट्टमहादेवी समजुतीनेच बोलत होत्या.

' कां नाही बनू शकत?'

' राजगादी मिळण्याचे काही नियम असतात, परंपरा असते....!'

' असू शकतात ना... पण ते नियम आणि परंपरा चालू न देण्याची चतुराई होत असेल तर त्या परंपरांचे काय प्रयोजन ?'

‘ यात चतुराईची काय गोष्ट ?’

‘ ठीक आहे! सन्निधानांचे मोठे भाऊ राजा बल्लाल यांचा आणि त्यांचा पुत्र नरसिंह यांचा मृत्यू तुमच्या विवाहानंतरच झाला ना ?’

‘ त्याचा येथे काय संबंध ?’

‘ आपल्याच मनाला विचारा ! तुम्हाला केवळ माझा आणि माझ्या वडिलांचाच द्वेष नाही तर, आचार्यजींच्या सगळ्याच भक्तांचा द्वेष आहे... आचार्यांच्या समोर नाटक करून त्यांचे मन जिंकल्याचे वाटत असेल तर...तर या भ्रमात राहू नका! आचार्य तुम्हाला चांगले ओळखून आहेत. तुम्ही आतून एक तर, बाहेरून दुसऱ्याच आहात,हे त्यांनी त्यांच्या सर्व भक्तांना देखील सांगितले आहे....’

‘ लक्ष्मी, या अविवेकी गोष्टींचे कोणतेच उत्तर माझ्याकडे नाही....’

‘ मी अविवेकी काय? मी जिद्दी आहे हे लक्षात ठेवा!! माझी अभिलाषा पूर्ण होईस्तोवर गप्प बसणाऱ्यांतील मी नाहीय्.....!

‘ लक्ष्मी, सन्निधानांनी तुमच्याशी विवाह करावा की नाही, हे पूर्णपणे माझ्या हातात होते.... एवढेच नव्हे तर, बाकीचे विवाह करण्यास नकार देणे देखील माझ्याच हातात होते! तेव्हाच जर मी ही लग्ने होऊ दिली नसती तर, सवत येण्याचा प्रश्नच नव्हता. परंतु माझी आकांक्षा होती की सवती बहिणींप्रमाणे राहाव्यात. आता तुम्ही प्रश्नच विचारला म्हणून सांगते, जेथे सर्वप्रथम आमच्या दोघांच्याही मनात एकमेकांबद्दल प्रेमभाव निर्माण झाले होते, ती जागा सगळ्यांना नेहमी शांती प्रदान करणारी राहो म्हणून शांतिनाथ स्वामींची प्रतिष्ठा केली. धर्मपरिवर्तन करण्यापासून सन्निधानांना रोकणे देखील मला शक्य होते..... परंतु मी तसे केले नाही ! दुसऱ्यांना संयमाचा उपदेश देण्याऐवजी, स्वतः संयम ठेवावा ही माझी रीत आहे.....’

‘ तुम्ही हज्जार कारणे सांगा, जग काही डोळे बंद करून बसत नाही! तुमच्या या संयमाच्या मागील राजकारण सगळे जाणतात...तुम्ही पट्टमहादेवी आहात म्हणून कोणी काही बोलत नाही इतकेच... या राजमहालात आपल्या ऐवजी दुसऱ्या कोणाचे नाव चालणारच नाही अशी व्यवस्था तुम्ही बनवली आहे आणि याच्या कोणी मधे आले तर त्याला कोणत्या ना कोणत्या बहाण्याने तुम्ही दूर करता......!’ – लक्ष्मीदेवी थांबायला तयारच नव्हत्या.

आता मात्र पट्टमहादेवींची सहनशक्ती संपायला आली त्यांनी घंटी वाजवली. दासी प्रविष्ट झाली. तिला सांगितले,‘राणी आपल्या विश्रामगृहात जातील...’

दासीने पडदा बाजूला केला आणि राणींना मार्ग दाखवला.

लक्ष्मीदेवींचा तिळपापड झाला, त्यांनी अशी अपेक्षा केली नव्हती.

**मन घायाळ घायाळ......मन क्षमाशील क्षमाशील**

शांतलादेवी बराचवेळ चिंतामग्न अवस्थेत बसून होत्या. लक्ष्मीदेवींचा एक एक शब्द जणू धारदार सुरीसारखा हृदयावर फिरत होता, जणू तन-मन विदारण करून राहिला होता! इतक्यातच सन्निधान स्वतः येत असल्याचा निरोप आला.

स्वतःला सावरत त्या उठून सामोऱ्या गेल्या. चेहऱ्यावर उसनं हसू आणून स्वागत केले.

‘ देवी, एक नवीन बातमी आली आहे....!’

बोलणे मधेच तोडत पट्टमहादेवी बोलल्या, ‘कोणती ? नव्या धार्मिक क्रांतीची.... ?’

‘ तुम्हाला अशी बातमी समजली ?’

‘ नाही ! परंतु राज्यातील परिस्थिती बघता असे वाटले, की सन्निधानांनी जो धर्म स्वीकारला, तो मी अंगीकारला नाही, म्हणून मी धर्मद्वेष्टी ठरले आहे ! स्वामी, मी माझा धर्म तर सोडू शकत नाही, मात्र पट्टमहादेवी पदाचा त्याग करू शकते, माझ्या मुलांना हे सिंहासन नको, हे देखील सांगू शकते. मी घरादाराचा त्याग करून माझे उर्वरित आयुष्य धर्मात व्यतीत करू शकते... परंतु मी अन्य धर्माचा द्वेष करते, हा आरोप मला नकोय.....’ उद्वेगपूर्ण

स्वरात शांतलादेवी बोलू लागल्या.

सन्निधान चकित होऊन शांतलादेवींकडे बघू लागले आणि म्हणाले, ' कसे कसे प्रसंग आले आणि गेले, तुम्ही कधी संयम सोडला नाही.... आजच असे काय घडले? आम्ही तुम्हाला काही सांगण्यास आलो तर तुम्ही भलतेच काही बोलून राहिलात.... झाले काय ? येथे लक्ष्मीदेवी येऊन गेल्यात का??'

' हो....'

' तरीच इतका उद्वेग ! विवेकशून्य तेज जीभ आज तलवारीगत चाललेली दिसते! आज काय नवीन सांगितले ?'

पट्टमहादेवींनी 'काहीच नाही..... सहजच आल्या होत्या..', असे बोलून सांगण्याचे टाळले आणि सन्निधानांच्या येण्याचे कारण विचारले.

'आपल्याप्रमाणे स्वतंत्र राज्याची अभिलाषा बाळगणारा जयकेशी चालुक्य विक्रमादित्यांचा जावई झाला आहे!'

' खरेच ही तर शुभ बातमी आहे. पण मग आता ते चालुक्यांकडून चढाई करतील कां?'

' छट्, त्याच्यात एवढे साहस नाही...आणि ते हल्ला करण्याची आपण वाट कां बघायची? आपणच चढाई करतो आहोत! त्यासाठीच सभा बोलवली आहे...'

' अच्छा ...... सभेला कोणाकोणाला बोलविले आहे?'

' हा कोणता नवीनच प्रश्न ? पट्टमहादेवींना काय माहित नाही की अशा सभांना कोण कोण असतात!'

' माहिती आहे ना...म्हणून तर खात्री करुन घेते ! आणि सांगू इच्छिते की, सन्निधानांनी या सभेला पूर्ण राणीपरिवाराला बोलवावे. सोबतच कुमार बल्लाल, छोटे बिट्टीदेव देखील आता मोठे झाले आहेत, त्यांनाही बोलवावे.'

' राणी बम्मलदेवी ठीक आहेत... परंतु राजलदेवी आणि लक्ष्मीदेवी येऊन काय करतील?'

' कां? त्यांच्या राहण्याने काय बाधा होणार आहे?'

' राजलदेवींचे ठीक आहे, पण लक्ष्मीदेवीचे येणे अनुचित होईल.'

' ते कां?'

' त्यांच्या जवळ बुद्धीची परिपक्वता नाही, स्वार्थाने भरलेली आहे. म्हणून त्या नकोत !'

' उचित स्थान मिळाले नाही तर, स्वार्थ व अतृप्तीची भावना निर्माण होते, म्हणून......'

**मूळ स्वभाव जाईना**

दुसऱ्या दिवशी नियोजित सभा वेळेवर सुरू झाली होती. आजपर्यंत आपल्यावर झालेल्या आक्रमणांना परतविण्यासाठी युद्ध लढल्या गेले होते, ज्याने राज्यविस्तार आपोआपच झाला होता. ही पहिलीच वेळ होती की, ज्यात स्वतः चढ़ाई करायची होती. या मुद्यावर ज्येष्ठ मंत्री, प्रधान मंत्री आदींची बरीच चर्चा झाली. तरुण रक्त महाराजांच्या बाजूने उभे होते, त्यांचे बाहुंना स्फुरण चढू लागले होते. मात्र ज्येष्ठांमधे प्रधानमंत्री गंगराज, मादिराज जैनधर्मीय विचारांचे होते, अन्यथा हिंसेला रोकू बघत होते. शिवाय वित्ताचा अपव्यय नको, या मताचे होते. स्वतः चढाई करण्यात धोका हा होता की, राज्याच्या चारही बाजूंनी शत्रूने डोके वर काढले असते. परंतु आत्ता स्वतः चढाई करून शत्रूबल कमी करणेही तेवढेच आवश्यक होते. शिवाय पुरेसे सैन्यबळ, वित्तसाठा शिलकीत होता. तरी देखील उपाययोजना म्हणून आर्थिक जमावटीच्या वेगवेगळ्या पर्यायांवर चर्चा झाली. त्यात एक पर्याय सुचविला गेला, राज्यात मंदिरांची संख्या, तेथे प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाची रक्कम गरजेपेक्षा बरीच जास्त आहे; तेव्हा ते उत्पन्न राज्याच्या अधिकोषाकडे वळिवले तर, युद्धकाळात अडचण निर्माण होणार नाही.

मंदिरांचे उत्पन्न राज्याकरिता घ्यावे की नाही, यावर चर्चा झाली. सर्वानुमते मंदिरांचे उत्पन्न राजकोषात जमा व्हावे असा चर्चेचा सूर होता, तोच अचानक राणी लक्ष्मीदेवी बोलल्या,

' शिवालये, जिनालये यांच्या उत्पन्नांचे काय

करायचे ते करा, परंतु केशव मंदिराचे उत्पन्न मात्र मंदिर कार्याकरिताच राहील...!'

राणींचा निर्णायक स्वर ऐकून वित्तसचिव मादिराजजी म्हणाले,

' राज्यात जो नियम अस्तित्वात येतो, तो सर्वांना सारखाच लागू होतो. त्यात धर्म, पंथ, जात असा भेद केला जात नाही, हे कदाचित देवींना माहित नसावे....'

राणी लक्ष्मीदेवी मोठ्या आवाजात म्हणाल्या,

'असा बहाणा करून केशवालयांचे अस्तित्व मिटवण्याचा विचार दिसतो. जेव्हापासून आचार्यजी हे राज्य सोडून गेले आहेत, तेव्हापासून कोणत्या ना कोणत्या बहाण्याने त्यांच्या भक्तांना त्रास देणे सुरु आहे.....!'

सगळे अचंबित होऊन बघू लागले,तोच सन्निधान थोड्या उंच आवाजात बोलले, 'देवी! सांगा कोणाला, केव्हा, कोणाद्वारे त्रास दिला गेला आहे?......'

एवढ्या सभेत, सर्वांसमोर लक्ष्मीदेवी सन्निधानांवर आरोप करीत म्हणाल्या,

' स्वतः सन्निधानांनी आमच्या वडिलांना देशोधडीला पाठविण्याचा दंड देऊ म्हटले होते....'

आता तर सगळ्यांच्याच चेहऱ्यावर वैताग दिसत होता.

सन्निधान म्हणाले,' म्हटले, पण केले नाही ना ! मग काय प्रश्न उरला? आता असे वाटते आहे की, आम्ही चुकलो! तेव्हाच देशाबाहेर करायला हवे होते. यापूर्वी या राज्यात कोणत्याही धर्माप्रति अपप्रचार झाला नव्हता. मात्र असा अपप्रचार पसरवून राष्ट्रद्रोहाचे कार्य तुमच्या वडिलांकडून होते आहे. एवढे बोलून ते सर्वांना उद्देशून बोलू लागले,

' आम्ही दोन-तीन दिवसांतच मोहिमेवर निघू... आमच्या सोबत थोरले युवराज कुमार बल्लाल असतील. नंतर ते उत्तर भागातील प्रदेशाचा राज्यकारभार बघतील. मधले छोटे बिट्टीदेव क्वालालंपूरला जाऊन तेथील राजकीय व्यवस्था बघतील. त्यांच्या सोबत योग्य अधिकारी वर्ग राहील. धाकटे विनयादित्य सध्या राजधानीत पट्टमहादेवींसोबत राहून शिक्षण पूर्ण करतील. राजधानीची पूर्ण व्यवस्था प्रधानमंत्र्यांच्या मार्गदर्शनात राहील. राणी लक्ष्मीदेवी आणि कुमार नरसिंह यादवपुरीला राहतील. त्यांच्यासोबत केलदहत्ति नायक राहतील.'

' तेथे दण्डनायक डाकरसजी स्वतः आहेत, तेव्हा मी सन्निधानां सोबत राहिलो तर.......?' केलदहत्तिनायक म्हणाले.

' छोट्या राणी दुसऱ्या कोणावर विश्वास ठेवत नाहीत, तेव्हा आपणच राहावे! त्यांच्या आणि कुमार नरसिंहांच्या स्वास्थ्याची देखरेख करण्यासाठी जे वैद्यराज हवे असतील त्यांना घेऊन जावे!' - एवढे बोलून सन्निधान उठून उभे राहिले.

स्वतः सन्निधानांनी पूर्ण निर्णय सांगितल्यावर सभा बरखास्त झाली. पट्टमहादेवी आश्चर्यात पडल्या होत्या, कारण युवराजांना कारभार सोपवण्याबाबत आधी काहीच बोलणे झाले नव्हते.

**तप्त मनावर हळुवार फुंकर**

दुपारी सन्निधानांना भेटण्यासाठी पट्टमहादेवी आल्या. महाराजांचा चेहरा बघूनच आज ते नेहमीप्रमाणे प्रसन्न नाहीत, हे जाणवत होते.

महाराज म्हणाले,' या! आम्ही आपली वाटच बघत होतो... खरे सांगू...? आम्ही तुमच्या उदारतेचा खूपच दुरुपयोग केला.... तेव्हा आता आम्हाला पीडा भोगावीच लागणार... आपण आपल्याला आणि आपल्या मुलांना याचा त्रास होऊ नये, म्हणून त्यांना या वातावरणापासून दूर पाठवीत आहोत... भविष्यात काय घडेल कोणी सांगावे..... ? म्हणून स्वतंत्ररूपाने त्यांना राज्यसंचालनाची संधी मिळावी, म्हणून हा निर्णय घ्यावा लागला. त्यांच्या राज्यकारभाराने ते प्रजेचे लाडके राजे बनले, तर ते त्यांच्या करता सुरक्षा कवच बनू शकेल. थोड्या दिवसांत विनयादित्यला देखील एका भागात पाठविणार आहोत. तुमचे ठीक आहे, तुम्हाला स्वतःकरिता काहीच नको असते! उद्या तुम्ही मुलांनाही काही नको, म्हणून दुसऱ्यांच्याच

सुखासाठी, त्यांच्या आशा-आकांक्षांच्या पूर्तीसाठी सगळा त्याग करण्यास तयार असाल, म्हणून तुमच्याशी सल्लामसलत न करता आम्ही स्वतः निर्णय घेतला. लक्ष्मीदेवींना सभेत बोलविण्यास तुम्ही भाग पाडले....त्यांची कूपमण्डूक वृत्ती सगळ्यांनाच दिसली.... आता तरी तुमची उदारता कमी करा...!'

पट्टमहादेवींना काय बोलावे कळेना, पण महाराजांना या मानसिक द्वंद्वातून बाहेर काढणे जरूरी वाटले, म्हणून विषय बदलत त्या म्हणाल्या, 'युद्ध काही काळ टळू शकले तर कुमार बल्लालचा विवाह केला असता.....'

' होऊन जाईल! काही हरकत नाही! सिंगिमय्या देखील वाट बघतच असतील...आमच्या लक्षातच आले नाही.'

' असे झाले तर, माझ्या आईवडिलांना बरे वाटेल! आपल्या म्हणण्याप्रमाणे कुमार बल्लाल उत्तर प्रदेशात जाणार आहेत. त्यांच्या सोबत ते देखील जातील. इथल्या धर्म-जाती भेदभाव वातावरणाने ते देखील व्यथित असतात.'

' आता या धर्मदर्शीचा बंदोबस्त कसा करावा, त्यांना कुठे पाठवावे हा विचार येतो आहे. ते राणी लक्ष्मींसोबत राहिले तर कुमार नरसिंहांचे मन देखील खराब करतील!'

' दूर तळकाडूला झालेल्या नवीन मंदिराचे धर्मदर्शी म्हणून त्यांना पाठवून द्यावे! राणी तर यादवपुरीत राहणार आहेत ना ?'

' बघतो ! लक्ष्मीदेवींची काय प्रतिक्रिया येते ते...... वडिलांविषयी त्या फार हट्टी आहेत! पण आज मी आमच्या मनातली एक गोष्ट सांगतो, आपल्याबद्दल कोणी काहीही बोलो...दुष्ट म्हणो किंवा अजून काही.... आमचा आपल्यावरचा विश्वास आणि प्रेम तिळभर देखील कमी होणार नाही! तुमच्याकडूनही आम्हाला हीच अपेक्षा आहे.'

' स्त्रियांचे समर्पण जीवनपर्यंत असते, विशिष्ट काळापर्यंत नसते. त्यामुळे सन्निधानांनी असा विचारच मनात आणू नये!'

' कुमार बल्लालांचे तर ठरले, आता धाकट्या बिट्टीदेवांचे काय?'

' त्यांचे सन्निधानांच्या दिग्विजयानंतर !'

' हो, नंतरच करू ! पण पट्टमहादेवींनी सूनबाई शोधली कां?'

' सन्निधानांच्या नावावर त्याचे नाव आहे ना ? सन्निधानांप्रमाणेच त्यांनी त्यांची वधू निवडली असेल तर ?' या बोलण्यावर दोघेही जोरदार हसायला लागले.... जुन्या आठवणींमध्ये बराच वेळ रमून गेले.

एक दीर्घ श्वास घेत सन्निधान म्हणाले, 'ते सोनेरी दिवस परत यायचे नाहीत....! देवी, आपण जर मनावर घेतले तर, या दिग्विजयानंतर हे राज्य कुमार बल्लालांवर सोपवून एक-दोन वर्षे एकांतात रहायला जाऊ .'

'बघू .....पुढचे पुढे!' असे म्हणून पट्टमहादेवींनी निरोप घेतला .

सर्व व्यवस्था करून, सर्वांना नियोजित स्थळी रवाना करून सन्निधान दिग्विजय यात्रेला निघाले. दोन-तीन महिने गेले असतील तर, एके दिवशी गुप्तहेराने बातमी आणली, पट्टमहादेवींची हत्या करण्याचे षडयंत्र रचले गेले आहे आणि काही लोक राजमहालाच्या आसपास फिरत आहेत.

राज्याचे महत्त्वाचे सर्व सदस्य बाहेर असतांना पट्टमहादेवींच्या हत्येच्या षडयंत्राची बातमी येऊन धडकली. याचे सर्वदूर परिणाम काय होतात, पट्टमहादेवी या संकटाला कशा सामोऱ्या जातात.... ते बघू या पुढील भागात !

**(क्रमशः)**


**वर्गणीदारांना विनंती...**

**कृपया वार्षिक व आजीवन वर्गणीदारांनी आपली वाढीव वर्गणी पाठवून सहकार्य करावे..**

# प्राकृत जैन साहित्यात ‘अचेलकत्व’ची संकल्पना

**सन्मती शहा,** संशोधक छात्रा,
प्राकृत भाषा विभाग, सोलापूर विद्यापीठ. सोलापूर.

भारतात अस्तित्वात असलेली सर्व दर्शने (चार्वाक तत्त्वज्ञान वगळता) ‘मोक्ष’ हेच अंतिम ध्येय मानतात. सामान्यतः, जन्म-मृत्यू आणि दुःखाच्या चक्रातून मुक्तता ही मोक्षाची संकल्पना आहे; तथापि मुक्तीचा मार्ग, त्यासंबंधी निती व रिती भिन्न भिन्न आहे, बुद्धाने ‘दिव्यातील तेल संपल्यावर दिवा मालवून जावा तसे ‘निर्वाण’ची अवस्था मानली.’ वेद प्रामाण्य मानणारी मीमांसा, अद्वैत इ. सामान्यतः **‘ऋते ज्ञानात् न मुक्तिः’** अर्थात ब्रह्मज्ञानाशिवाय मुक्ती संभव नाही. ब्रह्मरुपात सामावून जाणे, परमात्म्यात विलीन होणे याला मोक्ष मानले. यासाठी क्रोध, मान, माया, लोभ या कषायांवर विजय मिळवणे, संयम धारण करून साधू बनणे याला प्राधान्य दिलेले दिसते.

जैन दर्शनानुसार मोक्ष प्राप्त करण्यासाठी जिनदेव कथित तत्त्वांवर विश्वास आणि त्या तत्त्वांचे नेमके ज्ञान जरुरी आहे. श्रद्धा आणि ज्ञानानुसार तसे आचरण हे त्याहूनही महत्त्वाचे आहे. आ. कुंदकुंददेवांनी ‘प्रवचनसार’मध्ये म्हटलेलेच आहे की **‘चरितम् खलु धम्मो’** चारित्र्य अर्थात् आचरण हा धर्माचा सार आहे. मुक्ती केवळ अध्यात्म ज्ञानाने, देवाच्या उपासनेने, भक्तीने, मिळत नाही तर संयमाचे आचरण आवश्यक आहे

दर्शन विचारधारा सांगते, तत्त्वज्ञान सांगते; आणि धर्म ते तत्त्वज्ञान धारण करण्याचा, आचरणात आणण्याचा मार्ग सांगते. जिनधर्म आचरण प्रधान आहे.

**जैनधर्म : मोक्षमार्गावरील वाटचाल**

जैनदर्शन धर्म साधण्यासाठी सर्वप्रथम समोर श्रेष्ठ आदर्श उपस्थित करते. अरिहंत, सिद्ध, आचार्य, उपाध्याय आणि ‘सव्व साहू’ हे पंच परमेष्टी श्रेष्ठ आदर्श आहेत. हा णमोकार मंत्र म्हणजे कोणा व्यक्तिविशेषाची नाही तर गुणांची पूजा आहे, गुण वैशिष्ट्य प्राप्त उच्च पदांचे पूजन आहे. वस्तुतः या आत्मविकासाच्या या पायऱ्या आहेत. मोक्षाकडे वाटचाल सुरु करायची तर ‘साधू’ ही प्रारंभिक आणि अनिवार्य / आवश्यक अशी पायरी आहे. हा मंत्र, पंच परमेष्टी नमस्कार याने स्पष्ट होते की - कोणाच्या कृपाप्रसादाची नाही तर स्वप्रयत्नाने आत्मविकास साधण्याची जरुरी आहे.

संसारातील दुःखाला विटलेला साधक गुरूजवळ या दुःखापासून सुटकेसाठी उपाय विचारतो तेव्हा गुरु सांगतात, **‘पडिवज्जदु सामण्णं जदि इच्छदि दुक्खपरिमोक्खं।।** दुःखापासून सुटका पाहिजे असेल तर श्रामण्य स्वीकार कर.’ चारित्र्याधिकाराचा हा प्रारंभ आहे.

अशा प्रव्राज्जित साधू अहिंसा, असत्य, अस्तेय आणि ब्रह्मचर्य ही महाव्रते स्वीकारतो. त्यात अपरिग्रह हे ही एक महाव्रत आहे. सर्व परिग्रह सोडायचा म्हणजे, घर आणि घरातील सुखसोयी, घर आणि घरातील प्रिय, स्नेहीसोबती, यांपासून स्वतःची सोडवणूक, अगदी शरीराला अन् सोबत मनालाही बांधून ठेऊ शकणाऱ्या अंगावरील कपड्यांचाही त्याग असे हे अपरिग्रह व्रत आहे. हे निर्ग्रंथ, यथाजातरूप धारण करणारे व्रत आहे. अपरिग्रह हे स्पष्टपणे दिसणारे आचरण आहे आणि हेच व्रत अन्य अहिंसादी चार महाव्रतांनाही प्रकट करते. व्यक्त करते.

प्रवाज्जित साधूसाठी पांच महाव्रतांसह पंच समिती, पंच इंद्रीयनिग्रह, षट्आवश्यक तथा

केशलोच, अचेलक्य, अस्नान, अदंतधावन (दांत न धुणे), भूमिशयन, स्थितिभोजन आणि एकभुक्ती हे २८ मूलगुण सांगितले आहेत. साधुत्वाचे, श्रामण्याचे जणू अस्तित्वच या सर्व गुणांच्या परिपालनातच आहे. या आधारेच मुनिचारित्र्यात विशुद्धता येते. या २८पैकी एकाही गुणाला धक्का लागला तरी साधुत्वाचा गोफ विस्कटतो, श्रामण्य कमजोर होते, निःसत्त्व ठरते. 'अचेलक्य' हा यापैकीच एक मूलगुण आहे. आगमात दहा प्रकारचा स्थितिकल्प सांगितला आहे. यातही पहिला कल्प 'अचेलक्य' आहे.

**चेलादिसव्वसंगचाओ पढमो होदि ठीदिकप्पो।**
**इहपरलोइयदोसे सव्वे आवहदि संगो हु।।**

अर्थात्, 'चेल / वस्त्र आदी सर्व संग, परिग्रह त्याग हा पहिला स्थितिकल्प आहे. परिग्रह इह-परलोक संबंधी सर्व दोष घेऊन येतो. दोष टाळायचे तर 'चेलादिसव्वसंगचाओ' चेल आदी सर्व संग, परिग्रह त्याग आवश्यक आहे.

साधू / श्रमणाच्या चारित्र्यात अपरिग्रह महाव्रतात अचेलकत्वचा समावेश असूनही श्रमणाचे मूलगुण, स्थितिकल्प आदींमध्येही अचेलकत्वचा पुरस्कार वारंवार केला गेला आहे.

**अ-चेलकत्व : शब्द-चिंतन**

अचेलक वा सचेलक या शब्दांतील मूळ शब्द 'चेल' आहे. याच अर्थ कपडे / वस्त्रे असा होतो. अनेकदा पाहतो की 'अ' या उपसर्गाचा अर्थ नकारात्मक आहे; जसे अ-हिंसा म्हणजे हिंसा नाही, अ-सत्य म्हणजे सत्य नाही, अ-परिग्रह म्हणजे आसक्ती नाही. यानुसार, 'अचेल' चा अर्थ 'वस्त्र नाही' असा आहे. याचा अर्थ नग्नता आहे. व्याकरणकारांनी 'अ' या उपसर्गाचे ६ अर्थ दिले आहेत. -

ख) अभाव - अक्रोध - क्रोध नाही, क्रोधाचा अभाव

ii) अन्यत्व - अघटः जे घट इत्यादींपेक्षा वेगळे आहे.

iii) अल्पता - अज्ञान - अल्प ज्ञान

iv) अप्राशस्त्य - प्रशस्त नाही. अभाग : दुर्दैव

v) समानता - अब्राह्मण - ब्राह्मण नाही पण ब्राह्मणासारखे

vi) विरोध - अधर्म - धर्माच्या विरुद्ध

'अ-चेल' या शब्दाचे समानार्थी शब्द, जसे की नग्न - नग्घो, दिगंबर - दियम्बरो, निश्चेल - निश्चेल, वातरसनो, निर्ग्रंथ - निग्गंथ, अग्रंथी - अग्गंथी, अपरिग्रही - अपरिग्गही, इत्यादी, अर्धमागधी आणि शौरसेनी आगम ग्रंथांमध्ये वापरले आहेत.

दिगंबर परंपरामान्य शौरसेनी आगमात 'अचेलक' या संज्ञेचा अभिप्राय चेल / वस्त्र नाही, वस्त्राचा अभाव असा आहे.

श्वेतांबर परंपरामान्य अर्धमागधी आगमामध्ये, 'अचेल' हा शब्द 'अल्पचेल' या अर्थाने स्वीकारला जातो.

**आगमवर्णित 'सचेलकत्व' मान्यता :**

भ. महावीरांचा उल्लेख प्राचीन बौद्ध व जैन ग्रंथात 'निग्गठ्ठ नाथपुत्त' असा केला आहे. महावीर 'निग्गट्ठ' - अर्थात् निर्ग्रंथ होते. ना कषाय / विचारांची गाठ, ना वस्त्राची गाठ होती, याबद्दल दोन्ही जैन संप्रदायाचे एकमत आहे. आचार्य भद्रबाहू, सम्राट चंद्रगुप्त यांच्या काळात मगध प्रांती जो सुदीर्घ १२ वर्षीय दुष्काळ पडला त्याचा परिणाम म्हणून उत्तरेकडे जे साधूसंघ राहिले त्यांनी विषम परिस्थितीमुळे शिथिलाचार स्वीकारला. या संघाने साधू आचरणात वस्त्र-पात्र स्वीकारले. कालांतराने हाच आचार मानला. या सेवाडोसंघ'ने /श्वेतांबर संघाने हेही मत प्रचलित केले की- 'अक्खइ लोए धम्मं सग्गंथे अत्थि णिव्वाणं।' या लोकात स-ग्रंथ / सवस्त्र निर्वाण आहे असे सांगितले आहे.'

याबाबत आ. शीलांक म्हणतात, 'अचेल शब्दात 'अ' उपसर्ग अभाव दर्शवतो तसे अल्पताही दर्शवतो. 'अज्ञ'चा अर्थ ज्ञानशून्य नाही तर 'अल्पज्ञ' असाच होतो; तसे 'अचेल'चा अर्थ अल्पचेल असाच धारण केला पाहिजे. यानुसार श्वेतांबरप्रणीत आगमामध्ये 'अचेलकत्व'चा निर्देश आहे, परंतु

'अल्पचेल' या अर्थाने / असाच घेतला आहे. निषेधार्थक 'अचेल' शब्दाचा प्रयोग 'वनामध्ये निर्वस्त्र साधना करणाऱ्या हे 'मुनी'चे 'जिनकल्प' विशेषण आहे; आणि अचेल अर्थात् अल्प वस्त्र या अर्थाने स्थविरकल्प मुनींसाठी प्रयोग केला जातो.' असे आचारांग सूत्रात स्पष्ट केले आहे.

अर्थात्, स्थविरकल्पी मुनी सर्व वस्त्रांचा त्याग न करता अ-चेल म्हणजे अल्प चेल असाच भाव घेऊन दीक्षासमयी जशी प्रतिज्ञा स्वीकारली असेल त्याप्रमाणे एक, दोन वा तीन वस्त्र बाळगू शकतात. वस्त्र जीर्ण झाल्यावर बदलावे लागेल, परीजीर्ण वस्त्राचे अंतरपट वा उत्तरीय करावे, 'अदुवा एगसाडे अदुवा अचेले।' एक वस्त्र ठेवावे अथवा अचेल / निर्वस्त्र व्हावे. साधू क्षुधा, पिपासा, शीत, उष्ण, डासमच्छर इ.चा दंश, अचेल / नाग्न्य इ. २२ परिषह सहन करतो. यामुळे तप साधते. सचेल-अचेल दोन्ही स्थितीत समभाव ठेवावा.' असेही 'आचारांग'मध्ये म्हटले आहे.

उत्तराध्ययन सूत्रात आचार्य म्हणतात. --

**एगयाऽचेलए होइ सचेले यावि एगया।**
**एयं धम्महियं नच्चा नाणी नो परिदेवए।।**

मुनी विशिष्ट, विभिन्न परिस्थितीत कधी अचेल होतो तर कधी सचेल होतो. दोन्ही संयम यथाप्रसंग उपकारी/हितकारीच आहेत. असा विचार करून सचेल- अचेल स्थितीत खेद करू नये.'

दशवैकालिकसूत्राच्या चतुर्थ अध्ययनात पाच महाव्रतांचे स्वरूप कथन करत असता आ. शय्यंभव म्हणतात, 'गाव, नगर वा अरण्यात, अल्प वा बहु, सचित्त वा अचित्त सर्व प्रकारच्या परिग्रहाचा कायावाचामने - कृत-कारित-अनुमोदनाने त्याग करतो, या सर्वाची गर्हा-निंदा करतो व 'सव्वावतो परिग्गहाओ वेरमण।' - सर्वपकारच्या परिग्रहाचा त्याग व्रताचा स्वीकार करतो.' 'सर्व प्रकारचा परिग्रह महाभयाचे कारण आहे. परिग्रह त्यागाचा पराक्रम कर.' असे आचारांग सूत्रात आचार्य सांगतात. या सर्व प्रकारच्या 'परिग्रह त्याग'मध्ये 'जहजायरुवसरिसो' वस्त्रत्याग याचा निर्देश नाही.

सारांश, या आगमात, अचेलकतेचा पूर्णपणे निषेध नाही परंतु अल्प वस्त्राचा स्वीकार करून सचेलकतेचा पुरस्कार केला आहे; त्यानुरोधाने निरुपण / विवेचन आहे.

**आगमवर्णित 'अचेलकत्व'चा आग्रह :**

दिगंबर आम्नाय मान्य शौरसेनी आगम ग्रंथात सांगितले आहे. --

**ण वि सिज्झइ वत्थहरो जिणसासणे जइ वि होइ तित्थयरो।**
**णग्गो वि मोक्खमग्गो सेसा उमग्गया सव्वे।।**

'जिन शासनामध्ये वस्त्रधारी; तो 'तीर्थंकर' का असेना, सिद्धपद / मोक्ष प्राप्त करू शकत नाही. नग्नता हाच मोक्षमार्ग आहे, अन्य सर्व उन्मार्ग आहेत.' अर्थात नग्नता / अचेलकत्व परम आवश्यक मानली आहे.

'अचेल' शब्दाने केवळ वस्त्रत्याग अभिप्रेत नाही. चेल शब्द परिग्रह शब्दाचे उपलक्षण आहे. अचेलक्य शब्दाने 'वस्त्र आदि सर्व अन्य परिग्रहचासुद्धा त्याग 'तालप्रलंब न्यायाने' समजला पाहिजे. केवळ वस्त्रमात्राच्या त्यागाने संयम होत नाही; सर्व संग / परिग्रहाचा त्याग असेल तेव्हाच अचेलक्य मूलगुणांचे पालन होते. आचार्य शिवार्य हेच सांगतात की --

**ण य होदि संजदो वत्थमित्तचागेण सेससंगेहिं।**
**तम्हा अचेलक्कं चाओ सव्वेसि होइ संगाणं।।**

'अ-परिग्रह' हे अहिंसा, असत्य, अस्तेय और ब्रह्मचर्य प्रमाणे एक महाव्रत आहे. अपरिग्रह स्पष्ट व्यक्त होणारे आहे. हिंसा, असत्य, इ. पाच पापांचा, शरीरसंस्काराचा त्याग, शरीरावरील निर्ममत्व भावाने गवत उपटावे तसे डोक्याचे, दाढी-मिशी यांचा लोच आणि पिच्छीग्रहण करणे ही मुनीची चार विशेष शुद्ध लक्षणे आहेत. याला लिंगलिंग = चित्तशुद्धी म्हटले आहे. साधूच्या लिंगाच्या शुद्धीकरणाबरोबरच दर्शन, ज्ञान, चारित्र्य आणि तपस्येचेही शुद्धीकरण होते. २८ मूलगुणांच्या पालनाबरोबर थंडी, उष्णता, भूक, तहान, डास, मुंगी, कीटकदंश, नग्नता इत्यादी बावीस परिषह शांत आणि समभावाने सहन करतो किंवा त्यावर मात

करतो. असा अचेलक साधू जो 'जहजायरुवसरिसो' आहे, तीळ तुषमात्रही परिग्रह नाही, ना वस्त्र ना पात्र, आहार घेण्यासाठी याचे पाणिपात्र'च पुरेसे आहेत अशा साधूचे मुक्तिमार्गावर अग्रसर होणे निश्चित आहे. जसे आचार्य म्हणतात, –

**णिच्चेलपाणिपत्तं उवइट्टं परमजिणवरिंदेहिं।**
**एक्को वि मोक्खमग्गो सेसा य अम्मगया सव्वे।।**

असा निश्चेल / नग्नताच खरा मोक्षमार्ग आहे, अन्य सर्व 'उन्मार्ग' आहेत. असे असले तरी आचार्यांनी अचेलकता/नग्नता/ निर्ग्रन्थता साधूच्या अंतर्बाह्य परिग्रहाच्या त्यागरूप आवश्यकच असावी या महत्त्वाच्या बाबीकडे ध्यान आकर्षित केले आहे. आचार्य स्पष्टच विचारतात, **'भावेण होइ णग्गो, बहिरलिंगेण किं च णग्गेण'** पुढे याबाबत मार्गदर्शन करतात. –

**णग्गतणं अकज्जं भाव हियं जिणेहि पण्णत्तं।**
**इय णाऊण य णिच्चं भाविज्जहि अप्पय धीरं।।**

याचा अर्थ भावनेशिवाय नग्नता निरुपयोगी आहे, असे जिनेंद्रांनी म्हटले आहे, हे जाणून, आत्म्याचे स्वरूप अनुभवा.

**समारोप :**

या प्रकारे जैन धर्मात मुनीआचरणात वस्त्राचा स्वीकार – अस्वीकार या मान्यतेतून पंथभेद झाला. सचेलक परंपरेने सग्रंथ निर्वाण मान्य केले आणि याआधारेच स्त्री–मुक्तीचा पुरस्कार केला. अचेलक परंपरेत अचेलक स्त्री संभव नाही, यासह तिची शारीरिक अशुद्धी, मानसिक सुदृढता नाही इ. कारणाने स्त्रीमुक्ती मान्य केली नाही.

*********************

**संदर्भ सूची :**


१. जैन महेंद्रकुमार, 'जैनदर्शन', गणेशप्रसाद वर्णी जैनग्रंथमाला, संपा. श्री फुलचंद शास्त्री, द्वितीय, १९६६

२. आ. कुंदकुंद, प्रवचनसार, ३/१

३. महामहोपाध्याय चंद्रप्रभसागर, जैन पारिभाषिक कोश, प्रथम १९९०

४. 'कल्प' – साधूचर्या की शास्त्रोक्त विधी, म.म चंद्रप्रभसागर, जैन पारिभाषिक कोश, प्रकाशक : प्राकृत अकादमी, जयपूर, प्रथम आवृत्ती, वर्ष – १९९०

५. आ. शिवार्य, भगवती आराधना, गाथा . १११६ पृष्ठ ५०२

६ हिंदी शब्दसागर, पृष्ठ ५९ – द्वारा "Digital Dictionaries of South Asia' हिंदी विभाग.

७. आ. देवसेन, 'भावसंग्रह', गाथा १३७ – १५४, पृष्ठ १०१ – ११०

८. आचारांग सूत्र, प्रथम श्रुतस्कंध, ६/३/१८८ व्याख्याकार श्री अमर मुनी, – आ. शीलांकटीका, आचारांग सूत्र पत्रांक २२१, – पृष्ठ ३३८

९. म.म.चंद्रप्रभ सागर, जैन पारिभाषिक शब्द कोष, 'जिनकल्प'– जिनेन्द्र भगवानाप्रमाणे संयमाचे प्रखरतेने पालन करणारे मुनी, – पृष्ठ ५४

१०. -- उपरोक्त -- स्थविर कल्प – निर्धारित अनुशासनाचे / नियमांचे पालन करीत संघात राहणारे मुनी, पृष्ठ ११. आचारांग सूत्र, ६/३/१८८ व्याख्याकार श्री अमर मुनी, पृष्ठ ३३९

१२. --- उपरोक्त

१३. उत्तराध्यायन सूत्र, सचित्र, २ / १२–१३, पृष्ठ १२२, संपादक : श्री अमर मुनि, पद्म प्रकाशन, नई दिल्ली, द्वितीयावृत्ती वर्ष २०११

१४. दशवैकालिक सूत्र, गाथा – ४ / ११ पृष्ठ ५७

१५. आचारांग सूत्र, पंचम अध्ययन / द्वितीय उद्देशक, सूत्र १५७, पृष्ठ २५७

१६. कुंदकुंद आचार्य, अष्टपाहुड / सूत्रपाहुड, गाथा २३

१७. आ. शिवार्य, भगवती आराधना, गाथा ११२३

१८. --- उपरोक्त --- गाथा १११७

१९. आ. वट्टकेर, 'मूलाचार', गाथा ९०

२०. – उपरोक्त --- पंचाचाराधिकार, गाथा २५४ – २५५

२१, आ. कुंदकुंद, अष्टपाहुड / सूत्रपाहुड, १०


२२. आ. कुंदकुंद, अष्टपाहुड / भावपाहुड पृष्ठ ५४

२३. – उपरोक्त – पृष्ठ ५५

# वाचू आनंदे, लिहू नेटके!

पुस्तकावर बोलू काही...!

## पुस्तक समीक्षण...




पुस्तकाचे नाव- **टाईम अँड सेल्फ मॅनेजमेंट**

लेखिका : कांचन दीक्षित प्रकाशन : साकेत प्रकाशन

आपण प्रत्येकजण जीवनात यशस्वी होण्यासाठी सतत धडपड करत असतो. या धडपडीमध्ये आपल्याला ज्या तीन गोष्टींचा नेहमीच सामना करावा लागतो त्या म्हणजे, वेळ, ऊर्जा आणि पैसा. यापैकी वेळ ही एक अशी गोष्ट आहे जी परत येत नाही. म्हणूनच **'वेळेचे व्यवस्थापन' म्हणजेच 'आयुष्याचे व्यवस्थापन'** असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

या विषयावर अनेक पुस्तके लिहिली गेली आहेत, परंतु कांचन दीक्षित यांचे "Time and Self Management' हे पुस्तक एका वेगळ्या दृष्टिकोनातून वेळ आणि स्वतःच्या व्यवस्थापनाचा सखोल अभ्यास आपल्यासमोर ठेवते. एम.ए. मराठी, NLP कोच असलेल्या कांचन दीक्षित यांना विविध वयोगटांतील लोकांना वेळ व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्याचा अनुभव आहे. त्यांनी सादर केलेले विचार हे केवळ सैद्धांतिक नसून व्यावहारिकही आहेत.

हे पुस्तक केवळ एकदाच वाचून संपवण्यासारखे नक्कीच नाही... त्याचा अभ्यास करून त्यातील सूचनावजा माहिती आपल्याला आपल्या आयुष्यात वापरता आली तर आयुष्यात अनेक सकारात्मक बदल घडतील...याच हेतूने हा लेख लिहिण्याचा प्रयत्न केला आहे...

**वेळेचे व्यवस्थापन–**

कांचन दीक्षित म्हणतात, 'वेळ हा केवळ घड्याळात मोजला जाणारा घटक नसून तोच आपल्या जीवनाचा प्राण आहे.' त्यामुळे वेळेचे व्यवस्थापन हे फक्त वेळेवर कामं पूर्ण करण्यापुरते मर्यादित नसून, ते आपल्या संपूर्ण जीवनशैलीला दिशा देणारे असते. या पुस्तकात वेळेच्या व्यवस्थापनाला केवळ शिस्तीचा भाग म्हणून पाहण्याऐवजी, एका संपूर्ण आयुष्याच्या व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून पाहिले गेले आहे... आणि हे सर्व व्यवस्थापन, त्याच्या विभिन्न पद्धती अगदी सोप्या शब्दांत त्यांनी या पुस्तकात मांडल्या आहेत... वेळ व्यवस्थापन या क्लिष्ट विषयात अनेक सोप्या युक्त्या त्यांनी वाचकांना दिल्या आहेत आणि हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे...

**वेळेचे व्यवस्थापन ही प्रत्येकाची गरज**

हे पुस्तक कोणासाठी आहे? तर अगदी सर्वांसाठी.... कारण या पुस्तकात प्रत्येक वयोगटासाठी आणि विविध भूमिका बजावणाऱ्या व्यक्तींसाठी वेगवेगळ्या सूचना व मार्गदर्शक तत्त्वे दिली आहेत. विद्यार्थी वर्गासाठी अभ्यासाचे नियोजन, गृहिणीसाठी घरगुती कामांमध्ये वेळेचे योग्य विभाजन, मेनू प्लॅनिंग सारखा सोपा वाटणारा पण प्रत्यक्षात क्लिष्ट विषय, नोकरदार व्यक्तीसाठी प्राधान्यक्रम ठरवण्याच्या पद्धती आणि वृद्धांसाठी सकस वेळ वापराचे मार्गदर्शन यात दिलेले आहे.... अत्यंत व्यापक dimensions असणारे हे पुस्तक आहे..

लेखिकेने वेळ वाया घालवणाऱ्या सवयींना घड्याळाचे कुसंस्कार असे संबोधले आहे. वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी सवयींचा फेरविचार आणि नवी सवय अंगीकारण्याचे सहज तंत्र पुस्तकात दिलेले आहे. उदाहरणार्थ:- दररोज झोपायची ठराविक वेळ निश्चित करणं, "To-do list' चा वापर करणं, दिवसाची सुरुवात मानसिक स्पष्टतेसह करणं- ही तत्त्वे आजच्या धावपळीच्या जीवनात अत्यंत उपयुक्त ठरतात.

हे पुस्तक केवळ वेळेच्या व्यवस्थापनापुरते

मर्यादित नाही, तर स्व-व्यवस्थापन, भावनिक स्थैर्य आणि जीवनाचे अंतिम उद्दिष्ट याचा विचार करते. लेखिका म्हणतात, **'स्वतःची किंमत वेळेप्रमाणेच असते - तुम्ही स्वतःवर जितका वेळ देता, तितके तुम्ही समृद्ध होता.**' ही ओळ एक अर्थपूर्ण संदेश देते. Affirmations बद्दल सुयोग्य सोपी माहिती, त्यांचे महत्त्व हे या पुस्तकात आवर्जून वाचावे असे आहे...

**लेखन शैली-**

कांचन दीक्षित यांची लेखनशैली अतिशय साधी आणि सुसंगत आहे. वाचताना असे वाटते की एखादी जाणकार मैत्रीण आपल्याशी संवाद साधते आहे. त्यांचे अनेक लेख social mediaवर वाचायला मिळतात, अनेक सोप्या टिप्स या लेखांमध्ये असतात.... प्रत्येक लेखामधून आपण नक्कीच काहीतरी अर्थबोध घेतोच!

जसे अडचणीत सापडलेल्या एखाद्या व्यक्तीला सहजगत्या मार्ग दाखवावा तशी भाषा लेखिकेने वापरली आहे. त्यामुळे वाचक त्यांच्याशी लगेच कनेक्ट होतात....

या पुस्तकात दिलेली उदाहरणं सुद्धा काल्पनिक न वाटता प्रत्यक्ष आपल्या आयुष्यातील वाटतात. एक गृहिणी वेळेवर स्वयंपाक करताना मुलांच्या अभ्यासावर लक्ष कसे ठेवते किंवा एक विद्यार्थी मोबाईलच्या व्यत्ययांपासून वेळ वाचवण्यासाठी काय उपाय करतो - अशी चित्रं आपल्याला आपल्याच आयुष्यात दिसतात!

**महत्त्वपूर्ण संदेश-**

या पुस्तकाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यातील विचार वाचकाला आत्मपरीक्षण करायला लावतात. आणि या आत्मपरीक्षणातून, आपल्याला सगळं काही माहीत आहे, हा भ्रम निघून जातो. स्वतःला सुधारण्याची गरज किती आहे, हे समजल्यावरच वेळेचा खरा उपयोग होतो... आपल्या वास्तव परिस्थितीशी ओळख या पुस्तकाच्या माध्यमातून होते....

Time and Self Management हे पुस्तक केवळ वेळ कसा वाचवायचा हे सांगत नाही, तर वेळेच्या उपयोगातून आपलं संपूर्ण आयुष्य कसं अधिक परिणामकारक, सजग आणि अर्थपूर्ण करता येईल, याचा विचार करतं. 'ऊर्जा-वेळ-पैसा' या त्रिकूटावर आधारित जीवनाचे वास्तववादी गणित, भावनिक संतुलनाचे महत्त्व आणि सकारात्मक सवयींचा आग्रह यामुळे हे पुस्तक वाचनीय ठरते...

Self help या विषयावर हल्ली उपलब्ध असणाऱ्या अनेक पुस्तकांमध्ये हे पुस्तक उठून दिसते... त्यातील सहज सोप्या टिप्समुळे आपल्या मनाच्या जवळचे वाटते... या पुस्तकाच्या वाचनामुळे आणि त्यात दिलेल्या activitiesमुळे आपल्या जीवनात अनेक सकारात्मक बदल घडतील यात शंकाच नाही!

**-डॉ. चारुता दर्यापूरकर,** मुंबई

## कारंजा गुरुकुलात उपनयन संस्कार विधी

अक्षय तृतीया पर्वाचे औचित्य साधून मुनिश्री सुप्रभसागरजी महाराजांच्या ससंघ मंगल सान्निध्यात एकूण ५५ बालकांवर उपनयन विधीद्वारे श्रावक संस्कार प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी गुरुपरंपरेला स्मरण करून अर्घ्यार्पण करून पादप्रक्षालन व शास्त्रभेट पूर्वक गुरुपूजन करण्यात आले. त्यानंतर मुनिश्री प्रणतसागरजी महाराजांनी उपस्थित बालकांना व पालकांना उपनयन संस्काराचे महत्त्व व आवश्यकता समजावून सांगताना मद्य, मांस, मधू हे ३ मकार व पंच उदुंबर फळे यांचा त्याग म्हणजे अष्ट मुलगूण पालन करणे म्हणजे खऱ्या अर्थाने श्रावक धर्म होय, असे प्रतिपादन केले. त्यानंतर मुनीश्री सुप्रभसागरजी महाराजांचा उपनयन संस्कार प्रदान करण्यासाठी निवेदन केल्यानंतर मुनिश्रींनी बालकांच्या केशविरहित डोक्यावर स्वस्तिक चिन्ह अंकित करून, जनेऊ, ॐ कारमयी रजत लॉकेट, श्रीफळ व द्रव्य प्रदान करून मंत्रोच्चारण पूर्वक उपनयन संस्कार विधी संपन्न केला. त्यानंतर मुनीश्री सुप्रभसागरजी महाराजांचे मंगल उदबोधन प्राप्त झाले. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष, पदाधिकारी व विश्वस्तगण, आमंत्रित अतिथी, पालक वर्ग, संस्थेतील शिक्षक व कार्यकर्ते उपस्थित होते.



# त्रिवेणी भावांजली

प. पू. गुरुदेव १०८ श्री समंतभद्रजी महाराज हे नासिक येथील स्व. सेठ रतनचंदजी मेहता परिवाराचे श्रद्धास्थान!

मागील तीन पिढ्यांपासून मेहता परिवाराचे कारंजा(लाड) येथील दोन्ही व बाहुबली (कुंभोज) अशा तिन्ही गुरुकुल संस्थांशी अतिशय आत्मीयतेचे घनिष्ठ संबंध राहिले आहेत. या परिवारातील एक ज्येष्ठ सदस्य श्री. आमोदभाई रतनचंदजी मेहता यांचा नुकताच दि.११ एप्रिल २०२६ रोजी वयाच्या ८५व्या वर्षी अल्पशः आजाराने स्वर्गवास झाला आहे, ही घटना गुरुकुल परिवारांसाठी तर शोकदायक आहेच, पण समाजात देखील विलक्षण पोकळी निर्माण करणारी आहे.

स्व. आमोदभाई गुरुकुल संस्थांचे आधारस्तंभच होते. नैतिक मूल्यांवर आधारित गुरुकुल संस्थांच्या कार्यप्रणाली विषयी, तसेच बालक-बालिकांच्या शिक्षणासाठी व सक्षमीकरणासाठी संस्था करीत असलेल्या कार्यात त्यांना विशेष आस्था होती.

अध्यापकांना, विद्यार्थ्यांना व संचालक मंडळांना वेळोवेळी त्यांच्याकडून योग्य सूचना, सल्ला आणि सहकार्य मिळत असे. अत्यंत अभ्यासू वृत्ती, आधुनिक काळाला अनुसरून असलेली विचारसरणी, नेमकेपणा, अनुभवसंपन्नता या त्यांच्या गुणांमुळे आमोदभाईंकडून मिळत असलेले हे मार्गदर्शन संस्थेला नेहमीच अतिशय उपयोगी ठरले आहे. संस्था परिवार त्याबद्दल सदैव कृतज्ञ असणार आहे. प. पू. गुरुदेवांनी सन १९१८मध्ये अक्षयतृतीयेच्या सुमुहूर्तावर स्थापन केलेले पहिले गुरुकुल, कारंजा येथील श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम संस्थेला यावर्षी १०८ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्ताने संस्थेच्या प्रांगणात पू. गुरुदेवांची पूर्णाकृती प्रतिकृती उभारण्यासाठी श्री. आमोदभाई, पुत्र- श्री. प्राजक्त व श्री. कौस्तुभ मेहता आणि परिवार यांच्याकडून संस्थेला बृहत् दानराशी प्राप्त झाली होती. दि.१९ एप्रिल २०२६ अक्षयतृतीयेच्या सुमुहूर्तावर आयोजित या प्रतिकृतीच्या अनावरण समारंभासाठी आमोदभाई स्वतः उपस्थित राहणार होते. परंतु नियतीची खेळी वेगळीच होती....! असो.

या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाला शब्दबद्ध करण्याच्या आमच्या विनंतीला मान देऊन लिहिताहेत - स्व. आमोदभाईंचे उच्च विद्याविभूषित पुत्र श्री. प्राजक्त व कौस्तुभ मेहता आणि कन्या सौ. परिमल गांधी!

- संपादक

## १) स्व. आमोद मेहता - आकाशाला गवसणी घालणारं व्यक्तिमत्त्व!!!

आदर्श व्यक्ती कसे बनायचे हे सर्वजण खूप चांगले सांगतील, पण कितीजणांना ते आपल्या व्यक्तिमत्त्वात उतरवता येते? ह्या प्रश्नाचे उत्तर शोधणे फार अवघड आहे. पण आदर्श कारखानदार, आदर्श पती, आदर्श सामाजिक कार्यकर्ता, आदर्श पिता, आदर्श व्यक्ती मला पिता म्हणून लाभले हे माझं भाग्य. काही व्यक्तींचं आयुष्य म्हणजे एखाद्या शांत वाहणाऱ्या नदीसारखं असतं, ना फार गाजावाजा, ना दिवाळा... पण ज्याच्या काठावर उभं राहिलं, की थंडावा, समाधान आणि एक वेगळीच ऊर्जा मिळते. आमचे दादा श्री. आमोद मेहता अगदी त्याचे मूर्तिमंत उदाहरण,ज्यांनी आयुष्य जगलं ते स्वतःसाठी कमी आणि इतरांसाठी अधिक! आणि सृष्टीचा निरोप घेतला, तोसुद्धा अतिशय

समाधानाने आणि आपली ऊर्जा त्यांच्या संपर्कातल्या प्रत्येकासाठी मागे ठेऊन.

दादांच्या स्वभावाचे अनेक पैलू होते, पण त्यातली एक ठळक गोष्ट म्हणजे कर्तव्यनिष्ठा. कर्तव्य त्यांच्या दृष्टीने केवळ जबाबदारी नव्हती, तर एक साधना होती. घर असो, समाजकार्य असो किंवा वैयक्तिक आयुष्य, ते जे काही करत, ते पूर्ण मनानं, प्रामाणिकपणे करत. काम उरकण्यासाठी नाही, तर ते 'योग्य रीतीने' करण्यासाठी त्यांचा आग्रह असे.

त्यांच्या दैनंदिन आयुष्यातही हे दिसून यायचं, वेळेवर उठणं, दिवसाचं नियोजन करणं, प्रत्येक क्षणाचा अर्थपूर्ण वापर करणं, त्यांच्यासाठी वेळ हा केवळ घालवण्यासाठी नव्हता, तर तो 'जपायचा' होता. वयाच्या साठीपर्यंत त्यांनी कंपनीची कामं अगदी सचोटीने केली, फॅक्टरी उभी केली. आणि हे फक्त स्वतः आणि स्वतःच्या परिवाराचा विचार मनात न ठेवता, आपल्या आसपासच्या प्रत्येकाचा विचार ठेवला. आज त्यांच्या या कर्तव्यनिष्ठ वृत्तीमुळे ५००पेक्षा जास्त कुटुंबे आता आमच्या परिवाराचा सहजतेने भाग झाले आहेत.

**अखंड ज्ञान साधना–**

वेळेचा सदुपयोग हा त्यांच्या जीवनाचा अजून एक आधारस्तंभ. वय वाढत गेलं, तरी त्यांनी कधी 'आता काय करायचं?' असा प्रश्न स्वतःला विचारू दिला नाही. उलट, वयाच्या ८३व्या वर्षी त्यांनी संस्कृत भाषेचा डिप्लोमा केला आणि परत तो फक्त करायचा म्हणून नाही तर, फक्त अर्ध्या मार्काने त्यांचा संपूर्ण महाविद्यालयातून पहिला नंबर हुकला. हे केवळ शिक्षण घेणं नव्हतं, तर 'शिकत राहण्याची वृत्ती' जिवंत ठेवण्याचं उदाहरण होतं! वयाच्या साठीनंतर दादांनी कंपनीची धुरा आम्हा दोघा बंधूंच्या हातात दिली आणि स्वतःला अध्यात्माच्या अभ्यासात आणि वाचनात गुंतवून घेतले. आमच्या आईमुळेच दादा आध्यात्मिक वळणावर सहज रुजले, असं म्हणायला हरकत नाही. पण त्यांनी त्यातही त्यांचं बेस्ट दिलं, हा सर्वतोपरी दादांचा गुण! जवळपास १०००–१२०० श्लोक मुखोद्गत करणं आणि त्यासाठी स्वतःची एक आगळी पद्धत तयार करणं, ही त्यांच्या चिकाटीची आणि सृजनशीलतेची साक्ष होती. घरातल्या भिंतींवर, टेबलाजवळ, वह्यांच्या कडेला, आरशाच्यावर, कपाटामध्ये, त्यांच्या खिशात... त्यांच्याच सुंदर, स्वच्छ हस्ताक्षरात लिहिलेले दोन–तीन श्लोक दिसायचे. समयसार, रत्नकरंड श्रावकाचार, इष्टोपदेश, यासारख्या ग्रंथांचा सखोल अभ्यास दादांनी वयाच्या साठीनंतर अगदी सहज केला. दादांनी हे त्यांच्या कृतीतून आम्हाला शिकवून दिलं की, 'ज्ञानासाठी वेगळा वेळ काढायची गरज नाही, ते आयुष्यात विणून घ्यायचं असतं.' आपले अनेक मूळ ग्रंथ संस्कृत भाषेमध्येच आहेत. जर स्वतः संस्कृत शिकलो तर अजून चांगला अर्थ कळेल आणि यासाठीच संस्कृत शिकण्याची त्यांची इच्छा होती.

दादांचा आणखी एक सुंदर गुण म्हणजे, माणसं जोडण्याची आणि नाती टिकवण्याची कला! ते जिथे जात, तिथे नवीन लोकांशी सहज संवाद साधायचे आणि जुन्या लोकांना, नातलगांना, मित्रपरिवाराला आवर्जून भेटायचे. दादांसाठी हे नुसतं ओळखीचं नातं नसायचं, तर त्यात आपुलकी असायची. आणि एकदा नातं जुळलं की ते टिकवणं, ही त्यांची खासियत! कित्येक वर्षांपूर्वीचे संबंध त्यांनी तितक्याच प्रेमानं जपले होते. त्याची प्रचिती आम्हाला आमच्या घरातल्या मोठ्या मुलाच्या, सिद्धांतच्या, लग्नात आली. त्यांनी अगदी घरात येणाऱ्या दूधवाल्यापासून ते भाजीवाल्यापर्यंत प्रत्येकाला आग्रहाचे आमंत्रण आमच्याकडून द्यायला लावले. कारण त्यांच्या दृष्टीने 'आपलं' असणं म्हणजे, केवळ रक्ताचं नातं नव्हतं, तर मनाचं नातं होतं.

**मदतीचा अदृश्य हात–**

मदत करणं हा त्यांचा स्वभाव होता, त्यांचा मदतीचा हात नेहमी पुढे असे, पण तो प्रकाशझोतात कधी यायचा नाही. त्यात कधीही दिखावा नव्हता. त्यांनी अनेकांना मदत केली, पण त्याची जाहिरात

कधीच केली नाही. त्यांच्या मते, एका हाताने दिलेले दान दुसऱ्या हातालासुद्धा कळू नये असे असावे. आमच्या घरी येणाऱ्या पेपर वाटणाऱ्या मुलाला कानाचे मशीन हवे होते, ते त्यांनी अगदी सहज आणि वेळेत दिले. अनेकांना त्यांचे पैशाअभावी थांबलेले शिक्षण पूर्ण करायला दादांनी मदत केली. तसेच कोणाला स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा असेल तर त्यांच्यासाठीही दादांच्या मदतीचा हात सदैव पाठीशी असायचा. एखाद्याला गरज असताना त्याच्यासाठी शांतपणे उभं राहणं, ही त्यांची खरी ओळख होती.

मुलांवर संस्कार करण्याची त्यांची पद्धत अत्यंत वेगळी आणि प्रभावी होती. त्यांनी कधीही उपदेशाच्या भाषेत बोलून संस्कार केले नाहीत; त्यांनी अनुभवातून शिकवलं.

**जीवन शिक्षणाची कार्यशाळा–**

माझ्या लहानपणीची एक आठवण! आमच्या बागेतल्या चिकूच्या झाडावर आम्ही मुलांनी एक छोटंसं घर बांधलं, एक साधासा खेळ....पण त्यांनी त्याला एक सुंदर अर्थ दिला. त्या घराचा छोटासा वास्तू समारंभ त्यांनी आयोजित केला. आम्हा मुलांकडून त्यांनी हस्तलिखित पत्रिका लिहवून घेतल्या, त्या घरी येणाऱ्या सर्वांना वाटायला लावल्या, पूजा करवली आणि अगदी छोटेखानी स्वयंपाकही आम्हा मुलांकडून करवून घेतला! इतकेच नाही तर चक्क ३०-३५ फूट उंच असलेल्या झाडावरच्या घरात ते आले देखील!! ही केवळ एक घटना नव्हती, ही 'जीवनशिक्षणाची कार्यशाळा' होती. त्यातून आम्ही मुलं सहजपणे जबाबदारी काय असते, आयोजन कसं करायचं आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे, आपल्या कृतीला अर्थ कसा द्यायचा? या गोष्टींशी जोडले गेलो ते आयुष्यभरासाठी! त्यांची ही सवय त्यांच्या नातवांपर्यंत अगदी अशीच राहिली. जेवणाच्या टेबलवर नातवांशी होणाऱ्या गप्पा, दोन्ही पिढ्यांना बांधणाऱ्या- घडवणाऱ्या ठरल्यात.

दादांची आणखी एक महत्त्वाची देणगी म्हणजे, निर्णय क्षमता वाढवणं. ते मुलांना किंवा आसपासच्या लोकांना थेट उत्तरं देत नसत. ते प्रश्न विचारायला शिकवत. कोणी काही विचारलं, की ते लगेच उत्तर देण्याऐवजी म्हणायचे, 'तुला काय वाटतं?' या एका प्रश्नातून ते समोरच्याला विचार करायला भाग पाडायचे. त्यांच्याशी संवादातून दिशा मिळायची आणि निर्णय घेण्याची ताकद समोरच्यात निर्माण व्हायची. हेच खरं मार्गदर्शन, जे माणसाला स्वतः उभं राहायला शिकवतं! वयाच्या साठीनंतर त्यांनी फॅक्टरीतील वेळ कमी केला, पण मी आणि प्राजक्त भैय्या आम्ही वेळोवेळी, त्यांचा सल्ला घ्यायला, त्यांच्याशी चर्चा करायला जायचो. त्यावेळी आम्हा दोघांचाही अनुभव अगदी हाच होता की, त्यांनी त्यांचे निर्णय आमच्यावर कधी लादले नाहीत, तर त्यांनी आम्हाला निर्णयक्षम घडवलं.

**संघटन कौशल्य–**

दादांचं समाजकार्यही तितकंच प्रभावी आणि प्रेरणादायी. JCI चे President म्हणून त्यांनी केवळ पद सांभाळलं नाही, तर त्या पदाला नवा अर्थ दिला. दादांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या नासिक जेसीजब ह्या चॅप्टरला २३ पैकी २१ पुरस्कार मिळाले होते! ही केवळ आकडेवारी नव्हती, तर त्यांच्या कार्यपद्धतीची, संघटन कौशल्याची आणि लोकांवर विश्वास ठेवण्याच्या वृत्तीची साक्ष होती. ते लोकांना 'कामासाठी' जोडत नसत, तर 'उद्दिष्टासाठी' प्रेरित करीत असत. दादांच्या कारकिर्दीतच या संस्थांनी आपली कार्यपद्धती कशी असावी येथपासून ते आपल्या कामाची झेप कुठपर्यंत असावी, ह्याचे पायंडे पाडून घेतले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**सुंदर संतुलन–**

दादांचं आयुष्य म्हणजे एक सुंदर संतुलन- कर्तव्य, प्रेम, शिस्त आणि माणुसकी यांचं. त्यांचं आयुष्य खूप काही सांगून गेलं. त्यांच्या बोलण्याने, शिकवणीने कित्येकांना नेतृत्वाचे धडे मिळाले, कित्येक जण स्वतःच्या पायावर उभे राहिले तर,

कित्येक जण प्रेरणा घेऊन मोठे उद्योजक बनले. त्यांनी त्यांच्या सहवासामध्ये येणाऱ्या प्रत्येकाला पुढे जाण्याची ताकद दिली. आज त्यांच्या आठवणींना उजाळा देतांना एकच विचार मनात येतो की, संस्कार म्हणजे केवळ शब्द नव्हेत, तर कृतीः! आणि माणुसकी म्हणजे विचार नव्हे, तर जगण्याची पद्धत..!!

खरंच, पूर्वपुण्याई म्हणून केवळ आम्ही त्यांच्या परिवाराचा भाग म्हणून जन्माला आलो, पण दादांनी केवळ आम्हाला घडवलं नाही तर, आम्हाला माणूस म्हणून जगायला शिकवलं. आज तीर्थरूप दादांना ही शब्दरूपी श्रद्धांजली वाहतांना एका गाण्याच्या ओळी मनात येताहेत–

**गुरुने दिला हा ज्ञानरूपी वसा,**
**आम्ही चालवू हा पुढे वारसा !**

**– कौस्तुभ आमोद मेहता**

---

## २) जीवन कसं जगावं ? हे शिकवणारे दादा!

'जीवन जगावं कसं' हे स्वतःच्या आचरणातून आमच्यासमोर ठेवणारे, जीवनातील प्रत्येक क्षण सत्कारणीच लावणारे दादा म्हणजे आम्हा सर्वांसाठी, किंबहुना त्यांच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी एक आदर्श व्यक्तिमत्व होते.जीवनात घडणाऱ्या कुठल्याही कठीण प्रसंगाचा आध्यात्मिक दृष्टिकोनातून विचार करणे, त्याचा सहज स्वीकार करणे, सकारात्मक व आनंदी वृत्तीने त्याला सामोरे जाणे ही आई–दादांकडून आम्हाला मिळालेली सर्वात मोलाची शिकवण म्हणता येईल.

कुठलाही प्रसंग अथवा प्रश्न असो, दादा कायम त्याच्या मुळाशी जात असत, त्याचा सखोल अभ्यास करून विचारात स्पष्टता आणत असत, आपला मार्ग धार्मिक व नैतिकतेच्या चौकटीत पडताळून घेत असत, सातत्य व प्रयत्नांची पराकाष्ठा करत मार्गक्रमण करीत आणि प्रयत्नाचे फलित सर्वांबरोबर वाटून कसे घेता येईल याचा सदैव विचार करीत असत. दादांच्या सहवासात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला याची प्रचीती आली असणार.

पुण्याच्या कॉलेज ऑफ इंजीनियरिंग (COEP) मधून दादांनी मेकॅनिकल इंजीनियरिंग पूर्ण केलं. कॉलेजमध्ये शिकत असतानाच कोल्ड फोर्जिंग या टेक्नॉलॉजीबद्दल माहिती त्यांच्या वाचनात आली. त्याकाळी नवीन असलेल्या ह्या टेक्नॉलॉजीचा दादांनी पाठपुरावा करून, सखोल ज्ञान मिळवून 'मेहता कोल्ड फोर्ज' या कंपनीची सुरुवात केली. एकदा सखोल अभ्यास करून निर्णय घेतला की कितीही कठीण प्रसंग आले तरी दादा कधीच डगमगत नसत. प्रत्येक अडचणीवर मात करून आणि स्वतःवर ठाम विश्वास ठेवून त्यावेळी सुरू केलेल्या उद्योगाचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. प्राजक्त भैय्या, कौस्तुभ आणि नवीन पिढीतील सिद्धांत यांच्या नेतृत्वातून साकारलेले मेटा फोर्जचे आजचे अस्तित्व हजारो व्यक्तींसाठी अर्थार्जनाचे स्रोत बनले आहे.

**परिपूर्णतेचा ध्यास–**

कुठलंही काम असो, दादा त्यात अगदी पूर्णपणे स्वतःला झोकून देऊनच ते पार पाडत असत. जेसी ही व्यक्तिगत विकास आणि सामाजिक कार्य या क्षेत्रात काम करणारी जागतिक स्तरावरील संस्था. या संस्थेचे अध्यक्ष असताना त्यांनी अनेक तरुणांना प्रोत्साहित करून अनेक सामाजिक प्रकल्प पार पाडले. त्यांच्या अध्यक्षीय वर्षात केलेल्या कामाची नोंद जागतिक स्तरावर अनेक बक्षीसे आणि मानपत्रे देऊन झाली आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे जेसीजच्या माध्यमातून काम करताना सर्व कार्यरत सभासदांना त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात जी मूल्ये मिळाली, जो

व्यक्तिगत विकास साधला गेला त्यासाठी आजही प्रत्येकाच्या मनात दादांबद्दल कृतज्ञतेची भावना आहे.

आई व दादांची वैचारिक व धार्मिक बैठक खूप पक्की होती. 'एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचे काहीही करू शकत नाही' हा जैन धर्मातील सिद्धांत वारंवार आम्हास सांगून ते कुठल्याही गोष्टीचे श्रेय स्वतःकडे घेण्यास विनम्रपणे नकार देत असत.कुठल्याही कामाची कधीही वाच्यता करायची नाही आणि स्तुतीसुमनांपासून सदैव दूर राहायचं, असाच त्यांचा कायम प्रयत्न असायचा.

**गुणग्राहकता–**

मुलगी या नात्याने मला व सर्व घरच्यांना त्यांच्याविषयी आदर, आपुलकी, प्रेम वाटणे हे साहजिक आहे. परंतु त्यांच्या संपर्कात आलेल्या हजारो व्यक्तींना त्यांच्याविषयी नितांत आदर, आपुलकी व प्रेम वाटावं आणि ते वर्षानुवर्षे वृद्धिंगत व्हावं, हे कशामुळे? असं नक्की दादांमध्ये काय होतं की, हजारो लोकांच्या हृदयात ते अढळ स्थान मिळवू शकले ?

जसं मला आठवतंय्, तेव्हापासून एकदाही– अगदी एकदाही मी दादांना निराश अथवा हताश बघितलेलं नाही. कायमच उत्साही, कायम कार्यरत, कायम सकारात्मक विचार, सकारात्मक चर्चा. त्यांच्या दैनंदिन जीवनात कायम 'अरे वा !', 'एकदम झकास!', 'मस्त!', 'छान!' अशा शब्दांची रेलचेल असायची. 'आपण कुणाला, कशी आणि काय मदत करू शकतो?' या विचाराभोवती आई आणि दादांचे नि:स्वार्थी आयुष्य गुंफले गेले होते. कुठलीही मदत करताना कायम समोरची व्यक्ती केंद्रस्थानी ठेवून त्या व्यक्तीचा प्रश्न कसा सोडवला जाईल, त्या व्यक्तीची प्रगती कशी होईल, सामाजिक प्रश्न कसा सुटेल हाच विचार कायम त्यांच्या मनात असे. स्वतःजवळची वैचारिक, बौद्धिक आणि प्रसंगी आर्थिक संपत्ती, गरज असेल तिथे विनाशर्त देण्याची सदैव इच्छा आणि कृती असल्यामुळे अनेक व्यक्तींबरोबर ते घट्ट नाते बांधू शकले. कोणाच्याही दुःखाच्या प्रसंगी तत्परतेने मदतीला धावून जाणं आणि शक्य असेल त्या त्या सर्व प्रकारे समोरच्या व्यक्तीला मदत करणं हा आई–दादांच्या जीवनाचा सहज स्वभाव बनला होता आणि त्यातूनच आई–दादांचा अत्यंत परोपकारी जीवनप्रवास घडला असावा.

**स्वाध्याय व संयमाचरण–**

नियमित स्वाध्याय आणि धर्माचा सखोल अभ्यास ही आई–दादांच्या जीवनातील प्राधान्याची गोष्ट होती. वयाच्या अठराव्या वर्षीच आईने रात्रिभोजन त्याग व कंदमुळांचा त्याग असा नियम घेतला होता. तिच्या या नियमांचा दादांनी कायम आदरच केला. स्वतःच्या व्यस्त कामातून वेळ काढून कारंजाला जाऊन, आदरणीय विजूताईंजवळ 'समयसार' ग्रंथाचे त्यांनी सखोल अध्ययन केले. स्वतःचा धार्मिक अभ्यास पायरी– पायरीने वाढवत, दादांनीही रात्रिभोजन त्याग, कंदमुळांचा त्याग, अष्टमी–चतुर्दशी एकाशन असे संयमित जीवन स्वीकारले होते. वयाच्या पन्नासाव्या वर्षानंतर हजारो श्लोक त्यांनी मुखोद्गत केले होते. मूळ जैन ग्रंथ संस्कृत आणि प्राकृत भाषेत आहेत व त्यांचा भावार्थ नीट समजायला हवा यासाठी वयाच्या ८३व्या वर्षी संस्कृत डिप्लोमासाठी ॲडमिशन घेऊन विद्यापीठात दुसरेही आले. प्रचंड इच्छाशक्ती, विचारातील स्पष्टता आणि घेतलेले काम तडीस नेण्यास संपूर्णपणे प्रयत्न करण्याची तयारी यामुळेच दादा हे सर्व करू शकले.

**स्वयं प्रयोगातून स्वास्थ्य–**

दादांनी स्वतःच्या आरोग्यावर केलेले काम देखील खूप प्रेरणादायी आहे. आहारावर प्रचंड नियंत्रण, अभ्यास करून स्वतःच्या आहाराची केलेली योजना, संयमित आहार, आयुर्वेदातील औषधांचा अभ्यास करून त्यांचा जीवनशैलीत योग्य वापर, नियमित शास्त्रशुद्ध व्यायाम, कायम काहीतरी नवीन शिकण्याची बुद्धीला लावलेली सवय, दैनंदिन दिनचर्येमध्ये धार्मिक श्लोकांचे पठन–चिंतन–मनन आणि जीवनाकडे पाहण्याचा

अत्यंत सकारात्मक दृष्टिकोन या सर्वांमुळे वयाच्या ८५व्या वर्षी देखील कुठलेही औषध न घेता, सर्वांना आदर्श वाटेल असे अत्यंत निरोगी आणि उत्साही जीवन ते शेवटपर्यंत जगू शकले .

**खरी श्रद्धांजली**

सुमारे आठ महिन्यांपूर्वी आई गेली, तेव्हा 'तिने शिकवलेली मूल्ये अंगीकारणं हीच तिला खरी श्रद्धांजली आहे!' असे सांगून दादांनी आम्हां सर्वांना सावरले. आज दादांनी शिकवलेली मूल्ये जीवनात उतरविण्याचा प्रयत्न करणे आणि ज्या मार्गाचा आई-दादांनी सदैव आग्रह धरला, त्या धार्मिक स्वाध्यायाच्या मार्गाने पुढे जाण्यासाठी प्रयत्नशील राहणे; हीच त्यांना वाहिलेली खरी श्रद्धांजली असेल!

ॐ शान्ति !!

**सौ. परिमल गांधी,**
संचालिका, ब्रेन टॅलेंटस्, डॅलस (यू.एस.ए.)

---

# ३) दादा-एक जातिवंत अभियंता

दादा खरे इंजिनिअर होते....कारखाना म्हणजे दादांचा प्राण! प्रत्येक मशीनमध्ये दादांच्या परिश्रमांचा निवास, तर प्रत्येक कामगारामध्ये विश्वास! उद्दिष्ट आपल्या क्षमतांना आव्हान देणारे असावे, तेच आपला दर्जा उच्च पातळीवर घेऊन जाते! असं दादांनी एका वहीत लिहून ठेवलंय्!

१९६८ मध्ये 'मेहता कोल्ड फोर्ज' ही कंपनी सुरु केली, ती सुद्धा नाशिकच्या पंचवटीसारख्या छोट्याशा जागेत. त्याकरिता कोल्ड फोर्जिंग या प्रोसेसची पूर्ण माहिती करून घेतली.... दिवस-रात्र पुस्तके वाचली. १९८०-८२मध्ये युरोप-जपानला जाऊन प्रगत तंत्रज्ञान बघितले. जपानला गेले असतांना सरळ कंपनीला ऑफर दिली व एक महिना मुक्काम टाकून मशीन ऑपरेशन पूर्णपणे शिकून घेतलं. जगातलं सर्वोत्कृष्ट कंपनीचे मशीन आणलं तेच मुळी मोठं स्वप्न बघून !

**स्नेहातून विश्वास-**

१९७२मध्ये गोदावरीला मोठा पूर आला होता. कारखान्यात तब्बल आठ फूट पाणी साचलं. त्यावेळी सर्व कामगार एकजुटीने दादांच्या पाठीशी उभे राहिले. गाळ उपसला... साफसफाई केली. इलेक्ट्रिक मोटार व वायरिंगसाठी दादांनी बाबुभाईवर विश्वास टाकला. किमान सहा महिने कारखाना आता सुरु होत नाही असं अनेकांना वाटले होते, पण जेव्हा आठ दिवसांतच कामकाज सुरु झाले, तेव्हा सगळे आश्चर्यचकित झाले. प्रत्येक अडचणीवर मात करण्याचे कसब दादांकडे होते. त्यासाठी ते सर्वांवर विश्वास पण दाखवत असत..

कारखान्यातील कामगारांना दादांनी घडवलं. त्या काळात मशीन म्हणजे काय.. असे विचारणारे शेतकरी कुटुंबातील कामगारच जास्त ...! असे असतांना अनेकजण दादांच्या तालमीत तयार झाले. स्वतः मशीनवर उभे राहून त्यांनी लोकांना तयार केलं. त्यांच्यातला आत्मविश्वास वाढवला. त्यांच्या प्रत्येक अडचणीला त्यांच्या मागे उभे राहिले. म्हसरूळ येथे कारखान्यासाठी जागा घेतली तेव्हा लगेच कामगारांना तेथे राहण्यासाठी जागा लागेल, म्हणून पुढाकार घेत एक मोठी जागा घ्यायला लावली. तिथे आपल्या वीस-बावीस कामगारांच्या फॅमिली राहतील अशी सोय होणार होती.

**कामगारांचा सखा-**

आमच्या कारखान्यात टूलकिट मधील टॉमी आम्ही बनवायचो. एकदा तो पार्ट कस्टमरला खूप अर्जंट होता. पण मशीनला काही अडचणी होत्या. कस्टमर खूप मागे लागला होता. शेवटी

दादांबरोबर आम्ही सर्व जण रात्रभर मशीनवर होतो. मशीन ऑपरेटर, मेटेनन्सचे फिटर, सुपरवायझर व आम्ही असे सात-आठजण रात्रभर थांबलो. पहाटे मशीन चालू केलं व मग आम्ही घरी गेलो. पण ऑपरेटर तर आदल्या दिवशी सकाळी आलेले होते.... तब्बल २४-२५ तास थांबून त्यांनी माल काढून दिला. आपल्या कामगारांना असं प्रेम, विश्वास दादाच देऊ शकतात! त्यांच्यासोबत बसून आणलेला भेळ भत्ता खाणार, रात्री चुलीवर तयार केलेला कोरा चहा घेणार !!

श्री. धरमदेव व हेमराज हे दोघे कंपनीत वॉचमन होते. कंपनीच्या आवारात पाठीमागे राहायचे. कारखाना पंचवटीत असल्यापासून धरमदेव आमच्याकडे होते. एकदम विश्वासू! एकदा रात्री कारखान्यात चोर शिरले, हे त्यांना कळले. चोर जिथून शिरले असावेत त्या वाटेवर रात्रभर उभे राहिले....अजिबात हलले नाहीत! सकाळी इतर लोक आल्यावर आतमध्ये शिरलेल्या त्या दोन मुलांना पकडले. असे हे निर्भय व्यक्तिमत्त्व! कंपनीसाठी प्रसंगी कुठलीही रिस्क घेणारे....दादांना खूप मानणारे!! एकदा धरमदेव दादांकडे आले व म्हणाले, 'दादा ! आप सबको हमारे घरमें खाना खाने आना है, मैं खुद खाना बनाऊंगा!' सुट्टीच्या दिवशी आम्ही त्यांच्याकडे गेलो. त्यांनी स्वतः खीर, वालाची भाजी बनवली होती. खूप आनंदाने आम्हास जेऊ घातले. दादा व धरमदेव यांचे बाँडिंग विलक्षण होते !

आज मेटॅफोर्जमध्ये त्याच जपानच्या कंपनीच्या बऱ्याच मशीन्स आहेत. २०१० मध्ये दादांबरोबर जपानला गेलो होतो. तिथे मिमुरा सान होते. त्यांना देखील दादांबद्दल प्रचंड आदर! तेव्हा दादांनी सांगितले होते की, 'मी आता पुन्हा येईन ते माझ्या नातवाला घेऊन!'

मागच्या वर्षी मी परत जपानला गेलो होतो. मिमुरा सान तर रिटायर्ड झाले होते, तरी ते आमच्यासोबत आले. दोन दिवस फिरले. जेवताना म्हणाले ,'दादा म्हणजे एक अफलातून व्यक्तिमत्त्व. मला त्यांच्यासारखं जगायचंय्! ते जेव्हा मागे भेटले होते तेंव्हापासून मी ड्रिंक्स घेणं बंद केलं आहे.'

प्रत्येकाच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणणारे, स्वतःलाच आव्हान देणारे, सर्वांवर प्रेम करणारे दादा....खरेच आमच्यासाठी खूप काही होते...!

**-प्राजक्त आमोद मेहता**

*****

## मागील अंकाविषयी अभिप्राय....

*

आज सन्मति मासिकाचा अंक हातात आला. एकाच बैठकीत तो वाचून पूर्ण झाला. मनाला खूप आनंद झाला. पू. आर्यिका श्री पार्श्वमती माताजी, श्री चन्द्रमती माताजी, श्रध्देय कंकुबाई, श्रद्धेय विद्युल्लता भून, गजाभून ही सारी नावे परिचयाचीच, मात्र त्यांच्या जीवन कार्याचा या अंकाच्या निमित्ताने नव्याने परिचय झाला. सुमारे शंभर वर्षापूर्वी त्यांनी केलेल्या महान कार्यापुढे आजही आपले मस्तक नतमस्तक होते. त्या कठीण परिस्थितीत त्यांनी केलेले महान कार्य पाहून आपल्याला, सुखवस्तू परिवारात मग्न राहाणाऱ्या आजच्या महिलांना, त्यांच्या चरित्रांना वाचून काहीतरी करण्याची प्रेरणा मिळेल असे वाटते. आज शिक्षणाचा प्रचार-प्रसार खूप झाला आहे पण संस्कार आणि सुसंस्कृतपणा यांची कुठेतरी उणीव होत चालली आहे असे वाटते. आणि त्यासाठीच अशा वाचनाची आवश्यकता आहे. प्रज्ञाताई, उल्काताई, मडकर सर, विपुल खेडकर, स्वतः संपादक या सर्वांचेच लेख अतिशय अभ्यासपूर्ण आणि माहितीप्रद आहेत. सन्मतिचा महिला दिना निमित्तचा हा अंक वाचनीय, संग्रहणीय आहे. **-सौ. स्नेहा खेडकर,** नागपूर

# मागील अंकाविषयी अभिप्राय....

✻ जय जिनेंद्र ताई,

हा अंक पोस्टाने काल मिळाला. अक्षरशः झपाटल्यासारखा वाचून काढला. आपले संपादकीय मंडळाचे किती कौतुक करावे तेव्हढे थोडेच आहे!

सकल जैन समाजासाठी हे जणू प्रेरणादायी साक्षरता अभियान आहे. पद्मविभूषण अशा पदवीने या अंकास गौरवान्वित करावे वाटते.

तुमच्या ध्येयाला, जिद्दीला, चिकाटीला आणि नवनवीन साहित्य कृतींना सलाम!

दरवेळी एक सद्यःस्थितीवरचा, नवीन संशोधनात्मक पद्धतीचा अंक काढला जातो.

सन्मतिचा साहित्यिक दर्जा फार उच्च आहे यात वाद नाही. या साऱ्या कर्तृत्ववान आदर्श महिलांना अभिवादन!

संपूर्ण दोन शतकांचा आढावा घेऊन खूप विधायक कार्य आपण केले आहे.

यातून स्फूर्ती घेऊन खरोखर काही स्त्रिया पुढे होऊन असेच कार्य – स्त्री शिक्षण आणि स्त्री सन्मान यासाठी तळमळीने काम करतील हा आशेचा किरण दिसत आहे.

आपले अभिनंदन करण्यास शब्दसंपदा अपुरी आहे! असं वाटतं की, आपल्या सहवासात राहून अधिक ज्ञान मिळवावे आणि सक्रिय व्हावे.

नतमस्तक मी,

**– डॉ. सरिता कोठाडिया,**
सोलापूर

✻ प्रति,
श्रीमती प्रज्ञाताई डोणगावकर,

हा विशेषांक माझ्यापर्यंत पोहोचवल्या–बद्दल आपले मनःपूर्वक धन्यवाद.

या विशेषांकातून जैन धर्मशिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या महान महिलांचे अतुलनीय योगदान प्रभावीपणे समोर येते. प्रत्येक लेखातून त्या काळातील स्त्रियांनी भोगलेल्या सामाजिक अडचणी, शिक्षणाची कमतरता, लहान वयात विवाह व वैधव्य यांसारख्या कठीण परिस्थितींचे जिवंत चित्र उभे राहते.

या सर्व अडचणींवर मात करून त्यांनी जिद्दीने शिक्षण घेतले व इतर मुलींनाही शिक्षणाच्या प्रवाहात आणले, ही बाब अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांनी गुरुकुल, पाठशाळा व विविध संस्थांद्वारे धर्मशिक्षणाचा प्रसार करत समाजाला योग्य दिशा दिली. त्यांचे कार्य केवळ शिक्षणापुरते मर्यादित नसून संस्कार, चारित्र्य व आध्यात्मिक उन्नती घडवणारे आहे.

त्या काळात स्त्रियांना अनेक बंधने असूनही त्यांनी दाखवलेले धैर्य, चिकाटी आणि समर्पण खरोखर वंदनीय आहे. त्यांनी स्वतःच्या आयुष्याचा त्याग करून समाजातील पुढील पिढ्यांसाठी मार्गदर्शनाचा दीप प्रज्वलित ठेवला.

हा विशेषांक वाचताना त्या सर्व महिला 'मार्गदर्शक दीपस्तंभ' असल्याची जाणीव होते. त्यांच्या कार्यातून आजच्या पिढीला प्रेरणा मिळून समाजनिर्मितीत योगदान देण्याची उमेद वाढते. अशा महान स्त्रियांच्या कार्याचा गौरव करणारा हा अंक अत्यंत मोलाचा असून, तो प्रत्येकाने आवर्जून वाचावा असा आहे. या उत्कृष्ट व प्रेरणादायी विशेषांकासाठी संपादक मंडळाचे मनःपूर्वक विशेष आभार.

**– प्रा. उदय नांदगावकर,**
सेवानिवृत्त प्राचार्य, जे. सी. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, कारंजा (लाड)

✻ विपुल,

फार छान व अभ्यासपूर्ण संकलन! वाचून आपला समाज का एवढा पुढे गेला, याची प्रचीती येते.

सगळे लेख एकाहून एक सरस!
संग्रही ठेवावाच लागेल, असा अंक!!

**– डॉ. अर्चना जैन,**
नागपूर

# श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम जैन गुरुकुलच्या १०८व्या स्थापना दिवसानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

अक्षय तृतीया म्हणजे संस्थेचा तिथीप्रमाणे १०८वा स्थापना दिवस. या विशेष प्रसंगाचे औचित्य साधून शुक्रवार १७/०४/२०२६ ते रविवार १९/०४/२०२६ या दरम्यान प. पू. पट्टाचार्य श्री १०८ विशुध्दसागरजी महाराज यांचे परम शिष्य प. पू. श्रमण श्री १०८ सुप्रभसागरजी महाराज, १०८ मुनीश्री प्रणतसागरजी महाराज व क्षुल्लक श्री १०५ विप्रज्ञसागरजी महाराज यांच्या ससंघ मंगल सान्निध्यात गुरुदेव श्री समंतभद्र प्रणित गुरुकुल शिक्षण प्रणाली संगोष्ठी व गुरुदेव समंतभद्र प्रतिकृती अनावरण सोहळा आयोजित करण्यात आला होता.

शुक्रवार, दि. १७/०४/२०२६ रोजी आचार्य कुंदकुंददेव व आचार्य उमास्वामी यांच्या चरणपादुका गुरुकुल स्थित श्री महावीर दिगंबर जैन मंदिरच्या वरच्या भागात विधीपूर्वक स्थापन करण्यात आल्या. चरणपादुका विराजमान कर्ता- श्री राजकुमार डोणगांवकर, श्री. हर्षल डोणगांवकर व परिवार यांनी हे सौभाग्य प्राप्त केले.

शनिवार, दि. १८/०४/२०२६ रोजी गुरुदेव श्री समंतभद्र प्रणित गुरुकुल शिक्षण प्रणाली संगोष्ठीचे उद्घाटन सत्र दु. २.०० ते २.३० श्री सतीश संगई, अध्यक्ष, श्री. म.ब्र. आश्रम (जैन गुरुकुल) ट्रस्ट कारंजा (लाड) व प्रमुख अतिथी- श्री. दिनेश जी गंगवाल अध्यक्ष- श्री पार्श्वनाथ ब्रह्मचर्याश्रम गुरुकुल,वेरूळ, डॉ. प्रेमचंदजी पाटणी- वेरूळ व श्री. सुमितजी ठोले-वेरूळ या मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

संगोष्ठीचे प्रथम सत्र दु.२.३० ते ३.३० या वेळेत श्री. विनोदजी गडेकर यांच्या अध्यक्षतेखाली पं. श्री. जितेंद्रजी राठी शास्त्री, पुणे यांनी गुरुकुल व्यवस्थापन प्रणेते प.पू. गुरुदेव समंतभद्र महाराज यावर भाष्य केले. त्यानंतर द्वितीय सत्र दु. ३.४५ ते ५.०० या वेळेत डॉ. आलोक जी शास्त्री, कारंजा हे अध्यक्षस्थानी होते. पं. श्री. गुलाबचंद बोराळकर, वेरूळ यांनी गुरुदेव समंतभद्र महाराजांच्या सद्विचारांचा समाजमनावर झालेला परिणाम स्पष्ट केला. त्यानंतर मुनी श्री १०८ प्रणतसागरजी महाराज व प.पू. श्रमण श्री १०८ सुप्रभसागरजी महाराजांचे मंगल आशीर्वाचन प्राप्त झाले. सायंकालीन सत्राच्या प्रथम भागामध्ये अध्यक्षस्थानी डॉ. महावीरजी मांगुळकर, अकोला व वक्ता म्हणून डॉ. नेमीनाथजी शास्त्री, बाहुबली, (संपादक- सन्मति मासिक) हे होते. त्यांनी प.पू. गुरुदेव समंतभद्र महाराजांचे शैक्षणिक विचार याविषयी मार्गदर्शन केले. तसेच द्वितीय भागामध्ये श्री. आदिकुमारजी बंड, नागपूर हे अध्यक्ष होते तर वक्ता सौ. श्रद्धाताई पंकज खंडारे, नांदेड यांनी प.पू. गुरुदेव समंतभद्र महाराजांची गुरुकुल शिक्षण पद्धती ऐतिहासीक अभ्यास हा विषय मांडला. शेवटी संगोष्ठीच्या समारोप सत्राच्या अध्यक्ष स्थानी संस्थेचे विश्वस्त व श्री. राजाभाऊ डोणगांवकर, कारंजा (लाड) मार्गदर्शन केले.

रविवार, दि. १९/०४/२०२६ रोजी अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर रत्नत्रय फाउंडेशन- स्व. श्री. आमोदभाई मेहता व परिवार, नाशिक यांच्या विशेष सहकार्यातून गुरुदेव समंतभद्र सेंटर फॉर जैनीझममध्ये स्थापित होणाऱ्या गुरुदेवांच्या प्रतिकृतीचे अनावरण मुनिसंघाच्या मंगल सानिध्यात व आमंत्रित मान्यवरांच्या तसेच माजी स्नातकांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. अध्यक्षस्थानी श्री सतीशजी संगई, तसेच प्रमुख अतिथी म्हणून श्री. सतीशजी पेंढारी, नागपूर, श्री. विलासजी पाटणी, अकोला, श्री. अनिलजी झांझरी अकोला, श्री. मनोजजी कळमकर पुणे, श्री. श्रीपालजी बिलाला, अकोला मंचावर उपस्थित होते. संस्थेचे सहसचिव श्री परिमल भाऊ रुईवाले यांनी सभेसमोर प्रास्ताविक सादर केले. त्यानंतर कार्यक्रमाविषयीची भूमिका संस्थेचे विश्वस्त श्री. राजाभाऊ डोणगावकर यांनी मांडली. अतिर्थीनी आपल्या मनोगतातून संस्थेच्या स्थापनेपासूनच्या प्रवासाविषयी आपले संस्मरण सांगून संस्थेच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले ते म्हणजे गुरुकुल विद्यार्थ्यांची कंठपाठ प्रस्तुती. गुरुकुल मधील सर्व विद्यार्थ्यांनी छहढाला, रत्नकरण्ड श्रावकाचार, तत्त्वार्थसूत्र या ग्रंथांचे छंद, श्लोक व सूत्रांचे कंठस्थीकरण प्रभावीपणे सभेसमोर ऐकवले. त्यानंतर शेवटी मुनीश्री सुप्रभसागरजी महाराज यांचे आशीर्वचन लाभले. कार्यक्रमाचे सूत्र संचलन व आभार प्रदर्शन श्री. चिंतामण भुस यांनी केले.

श्री. म. ब्र. आश्रम हायस्कूलच्या प्रस्तावित नूतन इमारतीचे भूमिपूजन- सभा संपन्न झाल्यानंतर हायस्कूलच्या प्रस्तावित नूतन इमारतीचा भूमिपूजन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मंत्रोच्चारण पूर्वक मान्यवरांच्या हस्ते मंगल द्रव्य, जलक्षेपण करून व रजत कुदळ मारून भूमिपूजन संपन्न झाले. या भूमिपूजन कार्यक्रमासाठी आमंत्रित मान्यवर, संस्थेचे पदाधिकारी व विश्वस्त मंडळी, शाळेचे आजी - माजी मुख्याध्यापक व शिक्षकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07 Reg. No. KLR-022/2024-2026 Posted at Bahubali on- 30-04-2026

## वसतिगृहयुक्त जैन गुरुकुलामध्ये प्रवेश घ्या !

आपला पाल्य सुसंस्कारयुक्त व विद्वान व्हावा अशी प्रत्येक पालकाची इच्छा असणे स्वाभाविक आहे; ही इच्छा फलद्रूप व्हावी असे वाटत असेल तर आपल्या पाल्यास प. पू. गुरुदेवश्री समंतभद्र महाराजजीद्वारा संस्थापित गुरुकुलांत पाठविणे अत्यंत आवश्यक आहे. आज खालील सर्व गुरुकुलांमधून लौकिक शिक्षणाबरोबर अलौकिक आध्यात्मिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करवून देण्यात आली आहे. अशा शिक्षणाची दुर्मिळ संधी प्राप्त होणे हे महान भाग्याचे लक्षण आहे. म्हणून महाराष्ट्र व कर्नाटकातील ज्या त्या भागातील गुरुकुलात त्या त्या भागातील अधिकात अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा आणि आपले मानवी जीवन सुखी-समृद्ध व सुसंस्कारयुक्त बनवावे.

*** मुलांच्याकरिता गुरुकुल –**

१) श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र) संपर्क – ०२३०-२५८४४२२,९४२१२०७२३२
२) श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम, वीरवाडी, कारंजा, जि. वाशिम (महाराष्ट्र) संपर्क – ०७२५६-२२२७३१
३) श्री पार्श्वनाथ ब्रह्मचर्याश्रम, स्तवनिधी, जि. बेळगाव (कर्नाटक) संपर्क – ०८३३८ -२२०३७३, ७८२९९३१९९२
४) श्री भरतेश गुरुकुल, बेल्लद बागेवाडी, जि. बेळगाव (कर्नाटक) संपर्क – ०८३३८ -२६७०३४, ९९७५१३७६५४
५) श्री जिनसेनाचार्य गुरुकुल, तेरदाळ, जि. बागलकोट (कर्नाटक) संपर्क – ०८३५ -२५५११४
६) श्री पार्श्वनाथ ब्रह्मचर्याश्रम, एलोरा, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) संपर्क – ०२४३७-२४४५९०
७) श्री देशभूषण कुलभूषण ब्रह्मचर्याश्रम, कुंथलगिरी, जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र)संपर्क – ०२४७८-२७३८६०

*** मुलींच्याकरिता श्राविकाश्रम –**

१) श्री कंकुबाई श्राविकाश्रम, कारंजा (लाड), जि. वाशिम (महाराष्ट्र) संपर्क – ०७२५६-२२२३४४

पूज्य गुरुदेवश्रींच्या वरील सर्व गुरुकुलांमधून इ. ५ वी ते १० वी पर्यंतचे लौकिक व क्रमशः धार्मिक शिक्षण दिले जाते. सुज्ञ पालकांनी फोनवरून अथवा प्रत्यक्ष भेटून संपर्क साधावे. नियमावली, प्रवेशप्रक्रिया पाहून घ्यावी.

---

Merchant Name : BAHUBALI BRAHMACHARAY ASH
UPI ID : schoolbahubali@sbi
BHIM UPI

**विविध पारिवारिक समारंभानिमित्त बाहुबली गुरुकुलातील विद्यार्थ्यांना सद्दानराशी, पुरस्कार राशी, धर्मिक गतिविधीस प्रोत्साहन देण्यासाठी अथवा बाहुबली संस्थेस देणगी देण्यासाठी किंवा सन्मती मासिकाची वाढीव वर्गणी पाठवून देण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा आणि ट्रांझक्शन आयडी पाठवून द्यावे. जेणेकरून पावती करता येईल. आपल्या देणगीस आयकर सवलत मिळते. आपल्या सर्वांचे सहकार्य मिळावे, हीच सद्भावना...!!**

प्रेषक, www.sanmatimasik.com
सन्मति प्रकाशन
पो. बाहुबली,
जि. कोल्हापूर-४१६ ११०
फोन : ९० ४९ ४७ ३४ ३४
E-mail : sanmatimasik@gmail.com

प्रति,

RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07 Reg. No. KLR-022/2024-2026 Posted at Bahubali on- 31-03-2026
प्रकाशक : श्री. गोमटेश बेडगे, मालक : श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली
मुद्रण स्थळ : शिव इम्प्रेशन्स्, कोल्हापूर. प्रकाशन स्थळ : बाहुबली
सन्मति : वर्ष ७६वे, पुष्प दहावे : मे २०२६ : ४० (३६+४=४०)